दैनिक
लक्ष महाराष्ट्र
रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...
www.lakshamaharashtra.com lakshamaha.dhule@gmail.com lakshamaha.nsk@gmail.com ▶ RNI No.MAHMAR/2019/79184
▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ५ वे ▶ अंक : ९३ वा ▶ बुधवार दि. ७ फेब्रुवारी २०२४ ▶ किंमत :२ रु. ▶ पृष्ठे : ६

खुशखबर... खुशखबर...
खास लोकांच्या आग्रहास्तव
पार्सल सेवा व रिटर्न बुकिंग उपलब्ध
न्यू विजेयंत ट्रॅव्हल्स्, धुळे
धुळे ते नागपुर, अमरावती, अकोला
स्लिपर कोच २X१ नॉन एसी बस
रात्री १०.३० वाजेला

संपर्क:- Mo.7035436897, (02562) 236897, 237896
दु.नं.१४, प्रबोधनकार ठाकरे संकुल,धुळे

न्यूज कॉलम

तलाठ्यास धमकी देत मारहाण

शिरपूर । शिरपूर तहसिल कार्यालयातील तलाठी सुरेश तुकाराम ठाकरे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार नवे लोंढरे गावात एका ट्रॅक्टरमधून होणारी बेकायदेशिर वाळुची वाहतूक त्यांचेसह सहकारी तलाठी अनिरूध्द बेहळे यांनी रोखली. सदर ट्रॅक्टर तहसिल कार्यालय शिरपूर येथे नेत असताना ट्रॅक्टर मालकासह त्याचा साथीदार असे दोघे तेथे आले व त्यांनी शिवीगाळ करीत जीवे ठार मारण्याची धमकी दिली. या मारहाणीत शर्टाची कॉलर फाटली. वकील गोसावी, हंसराज पाटील यांचे विरूध्द गुन्हा दाखल झाला.

न्यायालयाच्या आवारातून दुचाकी केली लंपास

धुळे । जिल्हा न्यायालयाच्या आवारातून चोरट्याने दुचाकी लंपास केल्याची घटना उघडकीस आली. कनिष्ठ लिपीक दिग्विजय सुधाकर येवले यांनी १ फेब्रुवारीला त्यांची दुचाकी (एमएच १८, बीबी १९९८) न्यायालयाच्या नवीन इमारतीखाली लावली असता चोरट्याने लंपास केली. पोलिसांनी दुचाकीची किंमत २० हजार आकारली आहे.

वाहनातून गोवंशाची निर्दयतेने वाहतूक

शिरपूर । नरडाणा पोलीस स्टेशन हद्दीतील मुडावद गावाजवळ एका पीकअप वाहनातून निर्दयतेने होणारी गोवंशाची वाहतूक नरडाणा पोलिसांनी रोखली. पोकॉ विजय माळी मुडावद गावाजवळ एम.एच.१५/ ई.जी. ३६२४ क्रमांकाच्या पीकअप वाहनातून अत्यंत निर्दयतेने गोवंशाची वाहतूक करताना शिवाजी भटू काळी, रा.हाडाखेड, ता.शिरपूर हा आढळून आला. पीकअप वाहनात चार बैल अत्यंत निर्दयतेने बांधलेल्या अवस्थेत आढळून आले.

शरद पवारांना सर्वोच्च राजकीय धक्का
अजित पवार गटाला पक्ष आणि चिन्ह मिळाले

निवडणूक आयोगाचा निर्णय अजित पवार गटाला दिलासा

मुंबई । लक्ष महाराष्ट्र वृत्त

शरद पवारांना सर्वोच्च राजकीय धक्का बसला असून अजित पवार गटाला पक्ष आणि चिन्ह मिळाले आहे. त्यामुळे आगामी लोकसभेच्या पार्श्वभूमीवर शरद पवार यांना मोठा झटका बसला आहे.

शरद पवारांना सर्वोच्च राजकीय धक्का बसला असून अजित पवार गटाला पक्ष आणि चिन्ह मिळाले आहे. त्यामुळे आगामी लोकसभेच्या पार्श्वभूमीवर शरद पवार यांना मोठा झटका बसला आहे. शरद पवारांना सर्वोच्च राजकीय धक्का बसला असून अजित पवार गटाला पक्ष आणि चिन्ह मिळाले आहे. त्यामुळे आगामी लोकसभेच्या पार्श्वभूमीवर शरद पवार यांना मोठा झटका बसला आहे. आता निवडणूक आयोगाने अजित पवारांचा मार्ग प्रशस्त केल्याने आता आमदार अपात्रता निर्णय सुद्धा अजित पवारांच्याच बाजूने जाण्याची चिन्हे आहेत. शरद पवार गटाला निवडणूक आयोगाकडून स्वतंत्र गट म्हणून मान्यता देण्यात आली आहे. निवडणूक आयोगाकडून उद्यापर्यंत (७ फेब्रुवारी) शरद पवार गटाला चिन्हाबाबत कळवण्यास सांगण्यात आलं आहे. दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेसच्या निवडणूक निकालानंतर देवगिरीवर आज अजित पवार गटाची महत्वाची बैठक होत आहे. अजित पवार गटाचे प्रवक्ते सुनील तटकरे यांनी याबाबत म्हटलं की, आम्ही आतिशय आनंदी आहोत. निवडणूक आयोगाने हा महत्त्वाचा निर्णय देत भारतीय लोकशाही सिध्दातांवर शिक्कामोर्तब केलं आहे. याचे अंत:करणापासून स्वागत आहे. याचा आम्हाला आनंद आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष म्हणून आम्ही ठरवलेली ध्येय धोरणे ठरवून आम्ही काम करत आहोत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष म्हणून राज्यात अजित पवारांच्या नेतृत्त्वाखाली आपली भूमिका योग्य पध्दतीने बजावेल आणि राज्यातील जनतेचा फार मोठा पाठिंबा पाठबळ आम्हाला मिळेल असा विश्वास मी व्यक्त करतो असं तटकरे यांनी म्हटलं आहे.

शरद पवार गटाला मोठा धक्का

जो न्याय शिवसेनेच्या शिंदे गटाला तोच न्याय आता निवडणूक आयोगाने राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाला दिला आहे. राष्ट्रवादीचे चिन्ह आणि पक्षाचा निकाल हा अजित पवार गटाच्या बाजूने लागला असून हा शरद पवार गटाला मोठा धक्का असल्याचं मानलं जातंय. त्यामुळे येत्या निवडणुकीत शरद पवार गटाला वेगळ्या चिन्हावर आणि नावावर निवडणूक लढवावी लागेल हे स्पष्ट झालंय. निवडणूक आयोगाच्या या निकालाने येणाऱ्या राज्यसभेच्या निवडणुकीत मात्र शरद पवार गटाचा कस लागणार असून त्यांना अजित पवार गटाच्या अनिल पाटलांचा व्हिप पाळावा लागेल असं चित्र दिसतंय.

अजित पवार गटासाठी मोठा दिलासा

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या गटाला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचं नाव आणि घड्याळ चिन्ह देण्यात आलं आहे. अजित पवार गटासाठी हा सर्वात मोठा दिलासा आहे. अजित पवार यांना आता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षच मिळाला आहे. दुसरीकडे आगामी राज्यसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शरद पवार गटाला निवडणूक आयोगाने विशेष मुभा दिली आहे. शरद पवार गटाला आता निवडणूक आयोगाला नव्या चिन्हाचा प्रस्ताव पाठवावा लागणार आहे.

शिंदे गटाचा न्याय दादांच्या राष्ट्रवादीला

राष्ट्रवादीच्या आधी शिवसेनेच्या पक्ष आणि चिन्हाचा वाद हा निवडणूक आयोगासमोर होता. त्यावेळी आयोगाने शिवसेना पक्ष आणि चिन्ह हे शिंदे गटाचं असल्याचं सांगत तेच खरी शिवसेना असल्याचं स्पष्ट केलं. शिवसेनेत ज्या काही घडामोडी घडल्या त्याच पद्धतीने घडामोडी या नंतरच्या राष्ट्रवादीमध्ये घडल्या. अजित पवारांनी भाजपला साथ दिल्यानंतर बहुतांश आमदार हे त्यांच्यासोबत गेले आणि राष्ट्रवादीचा वाद हा निवडणूक आयोगामध्ये पोहोचला.

हिरे मेडिकल कॉलेजला आ.फारुख शाह यांची आकस्मिक भेट

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

भाऊसाहेब हिरे वैद्यकीय महाविद्यालय आणि सर्वोपचार रुग्णालयात संदर्भात सातत्याने तक्रारी येत होत्या म्हणून आ.फारुख शाह यांनी रुग्णालयास पूर्वसूचना न देता अचानक भेट दिली. यावेळी त्यांच्यासोबत नगरसेवक गणी डॉलर, रफिक पठाण, आसिफ शाह, अकिब अली, जुबेर शेख ,फैसल अन्सारी, सउद आलम,सलमान खान,समीर शाह,शाहरुख शाह आदी उपस्थित होते.

भाऊसाहेब हिरे वैद्यकीय महाविद्यालय आणि सर्वोपचार रुग्णालय हे धुळे शहर आणि जिल्ह्यासाठी वरदान ठरलेले आहे. मात्र काही कामचुकार कर्मचारी आणि अधिकाऱ्यांमुळे रुग्ण आणि नातेवाइकांना अनेक गैरसोयीचा सामना करावा लागतो. यासंदर्भात तक्रारी प्राप्त झाल्यामुळे आ.फारुख शाह यांनी कुठलीही पूर्वसूचना न देता भाऊसाहेब हिरे वैद्यकीय महाविद्यालय आणि सर्वोपचार रुग्णालयास अचानक भेट दिली. त्यावेळी रुग्णालयातील अस्वच्छता आणि कर्मचाऱ्यांचा हलगर्जीपणा अधिष्ठाता डॉ.भामरे यांच्या निदर्शनास आणून दिला. सुरुवातीस अधिष्ठाता कार्यालयात बैठक घेण्यात येवून सर्व विभागप्रमुख आणि कर्मचारी यांचेशी चर्चा करून सफाई कामगाराची अपेक्षित संख्या नसणे, तांत्रिक कर्मचाऱ्यांचा तुटवडा, डॉक्टरांचा तुटवडा यासारख्या समस्या जाणून घेतल्या.त्यानंतर अधिष्ठाता डॉ.भामरे, अधिक्षक डॉ.पाठक, डॉ.अरुण मोरे, डॉ. मुकरम खान, डॉ.परवेज मुजावर, प्रशासन अधिकारी कुमावत यांना सोबत घेवून बाह्य रुग्ण विभागाची पाहणी केली व संबंधितांना सक्त सूचना केल्यात.

फसवणुकीची रक्कम दीड कोटीच्या घरात

बबल्याच्या बँक खात्यात ७१ लाखांची रोकड

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

जीएसटी अधिकाऱ्याची बतावणी करून मुंबई-आग्रा महामार्गावर ट्रक अडवून व्यापारी फसवणूक प्रकरणात लवकरच परराज्यातील टोळीला अटक होण्याची शक्यता आहे. या प्रकरणात दोन दिवसांपूर्वीच अटक झालेला संशयित बबल्या याच्या बँक खात्यात ७१ लाखांची रोकड आली आहे.

त्यामुळे फसवणुकीची रक्कम एक कोटी ४६ लाखांवर गेली आहे. ही रक्कम दुप्पट होणार असल्याची माहिती पोलिस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी पत्रकार परिषदेत दिली. जिल्ह्यातील महामार्गावर जीएसटी अधिकारी असल्याचे खोटे सांगत पटियालातील व्यापाऱ्याची फसवणूक झाली होती. या प्रकरणाचा पोलिस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पोलिस पथकाने छडा लावला. त्यात निजामपूर (ता. साक्री) येथील पोलिस कर्मचारी बिपीन पाटील, मोहाडी पोलिस ठाण्याचा कर्मचारी इम्रान शेख याच्यासह नाशिक येथून स्वाती पाटील यांना याआधीच अटक झाली आहे. तिघे पोलिस कोठडीत आहेत. या प्रकरणी दोन दिवसांपूर्वी विनय सुरेश बागूल ऊर्फ बबल्या यास अटक झाली होती. चौकशीत त्याच्या बँक खात्यात ७१ लाखांची रोकड जमा झाल्याचे स्पष्ट झाले. याबाबत त्याला बँकेने विचारणा केली. तसेच तपासात आणखी चार संशयित समोर आले आहेत. त्यांनी आमच्या नावाने अकाउंट उघडल्याचे सांगितले. या प्रकरणात चोवीस तासांच्या आत परप्रांतीय टोळीलासुद्धा अटक होण्याची दाट शक्यता आहे. तसेच स्वाती पाटील ही बँकेची रिजनल हेड होती. त्यामुळे या प्रकरणात फसवणुकीची रक्कम दोन कोटींवर जाण्याचीही शक्यता पोलिस अधीक्षक धिवरे यांनी व्यक्त केली.

आमच्या आरक्षणावर डल्ला मारणे थांबवलेस तर उपकार होतील!

भुजबळांचा जरांगेंवर पुन्हा हल्ला

मुंबई । लक्ष महाराष्ट्र वृत्त

राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी मंगळवारी पुन्हा एकदा मराठा आरक्षणासाठी सरकारशी दोनहात करणाऱ्या मनोज जरांगे पाटलांवर निशाणा साधला आहे. त्या मनोज जरांगेला आधी ग्रामपंचायतीच्या निवडणुकीला उभे राहून निवडून येण्यास सांगा. पण त्यापूर्वी आधी नीट उभे राहून बोल म्हणावे, असे ते म्हणालेत. ओबीसींच्या आरक्षणावर डल्ला मारणे थांबवले तर त्यांचे खूप उपकार होतील, असेही भुजबळ यावेळी बोलताना म्हणाले.

छगन भुजबळ यांनी अहमदनगर येथील ओबीसी एल्गार मेळाव्याद्वारे मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्यास कडाडून विरोध दर्शवला. त्यांनी त्यावेळी कोल्हापुरातील एका नाभिक समाजातील तरुणासोबत घडलेल्या एका घटनेचा उल्लेख करत नाभिक समाजाला मराठा समाजाच्या नागरिकांचे केस न कापण्याचे आवाहन केले होते. त्यांच्या या विधानावर अनेकांनी हरकत घेतली आहे. पत्रकारांनी मंगळवारी त्यांना या प्रकरणी छेडले असता त्यांनी आपल्या विधानाचा विपर्यास करण्यात आल्याचा दावा केला. मी नाभिक समाजाला केलेले आवाहन केवळ एका गावासाठी होते, असे ते म्हणालेत. छगन भुजबळ यांनी यावेळी मनोज जरांगे ओबीसींमध्ये फूट पाडण्याच्या प्रयत्नांत असल्याचाही आरोप केला.

पत्नीच्या खूनप्रकरणी पतीस आजन्म कारावासाची शिक्षा

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

पत्नीच्या खूनप्रकरणी दोषी मानून धुळे सत्र न्यायालयाने पतीला आजन्म सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. सत्र न्यायमूर्ती श्रीमती जे. आर. पुलाटे यांनी काल ४ फेब्रुवारीला हा निकाल दिला. साक्री तालुक्यातील लखानी गावात निर्मलाबाई गणेश चव्हाण हिने पती गणेश एकनाथ चव्हाण याच्यासाठी रात्री जेवण तयार केले नाही, याचा राग येऊन पतीने १३ जुलै २०२२ ला सकाळी सातच्या सुमारास गावातील जिल्हा परिषदच्या ओट्यावर निर्मलाबाई यांना लाकडी दांडक्याने डोक्यावर, तोंडावर मारून ठार केले होते.

गुन्ह्याचा तपास पोलिस उपनिरीक्षक बी. एस. मालचे यांनी केला. त्यानंतर दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. या खून खटल्याचे कामकाज सत्र न्यायमूर्ती श्रीमती जे. आर. पुलाटे यांच्या न्यायालयात चालले. अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता ॲड. पराग पाटील यांनी कामकाज पाहिले. नऊ साक्षीदार तपासण्यात आले. साक्षी पुराव्याने आरोप सिद्ध झाल्याने सत्र न्यायमूर्ती श्रीमती जे. आर. पुलाटे यांनी आरोपी गणेश चव्हाण याला आजन्म सश्रम कारावास व दहा हजार दंड, दंड न भरल्यास एक वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. पैरवी अधिकारी म्हणून आर. डी. साळुंखे यांनी कामकाज पाहिले.

पाणी टंचाईच्या सावटात अनास्था; आढावा बैठकीकडे लोकप्रतिनिधी, अधिकाऱ्यांची पाठ

नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त

जिल्ह्यातील निम्म्या भागात पाण्याचे दुर्भिक्ष्य जाणवत असताना या स्थितीचा आढावा घेण्यासाठी पालकमंत्री दादा भुसे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीकडे बहुतांश लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांनी पाठ फिरवली. परिणामी अतिशय महत्वाच्या विषयावर चर्चा झाली नाही. पालकमंत्र्यांना अवघ्या काही मिनिटात बैठक आटोपती घ्यावी लागली.

ग्रामीण भागात पाण्याचे दुर्भिक्ष्य जाणवू लागले असून फेब्रुवारीच्या प्रारंभीच पाण्यासाठी भटकंती सुरू झाली आहे. टंचाईच्या सावटात सापडलेल्या जिल्ह्यातील १४० गावे, २९६ वाड्यांना टँकरने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करावा लागत आहे. पुढील काळात टंचाईग्रस्त गावांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढण्याची भीती आहे. मागणीच्या तुलनेत कमी पाणी मिळाल्याचे कारण पुढे करुन मध्यंतरी महापालिकेने नाशिक शहरात कपात लागू करण्याचा विचार केला होता. प्रशासनाने नव्याने आढावा घेण्याची सूचना केल्याने तो निर्णय लांबणीवर पडला. जिल्ह्यातील लहान-मोठ्या २४ धरणात ३३ हजार ९१३ दशलक्ष घनफूट म्हणजे ५१ टक्के जलसाठा आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत हे प्रमाण २२ टक्क्यांनी कमी आहे.

या पार्श्वभूमीवर, मंगळवारी दुपारी आयोजित बैठकीत पाणी टंचाईचा आढावा घेतला जाणार होता. पालकमंत्री भुसे हे बैठकस्थळी दाखल झाले. यावेळी केवल सीमा हिरे आणि माणिक कोकाटे हे दोन आमदार उपस्थित होते. त्यांच्या व्यतिरिक्त अन्य कुणी आमदार उपस्थित नव्हते. बैठकीत फारसे लोकप्रतिनिधी नसल्याने टंचाई आढावा वा चर्चेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. आमदारांप्रमाणे अधिकारी वर्गाची तुरळक उपस्थिती होती. अनेक आमदार परदेश वारीवर असून अधिकारी लग्न वा तत्सम सोहळ्यात रममाण झाल्याचे सांगितले जाते. याबाबतची माहिती भुसे यांना दिली गेली.

भाजप सरकार हे विद्यार्थी विरोधी सरकार: प्रदेशाध्यक्ष सुनिल गव्हाणे

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

शहरातील शरद पवार गट लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर जोरदारपणे कामाला लागल्याचे दिसत आहे. एका बाजूला शहरातील नेत्यांच्या मुंबईला बैठका वाढल्या आहेत तर दुसऱ्या बाजूला प्रदेश पदाधिकारी शहराला भेटी देत आहेत. याच पार्श्वभूमीवर काल राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सुनिल गव्हाणे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयात तरुण पदाधिकाऱ्यांची भेट घेतली.

यावेळी धुळे शहराध्यक्ष रणजीत राजे भोसले, शकीला बक्ष, उषा पाटील, वाल्मीक मराठे, राजू चौधरी,दीपक देवरे, भोला सैंदने, विश्वजीत देसले, रामेश्वर साबरे, युसूफ शेख, समद शेख, प्रशांत बोरसे, अभिजित देवरे, निखिल मोमया, निखिल पाटील,आविष्कार मोर,गौरव भैरव आणि इतर तरुण पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी प्रदेशाध्यक्ष सुनिल गव्हाणे यांनी सांगितले की, आगामी लोकसभेच्या पार्श्वभूमीवर आम्ही जास्तीत जास्त तरुणांपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न करणार आहोत. नवीन मतदारांपर्यंत पोहचण्यासाठी विद्यार्थी संघटना प्रयत्नशील राहणार आहे. यासाठी आमचे पदाधिकारी संघटन, उपक्रम, आंदोलन या त्रिसूत्रीवर काम करत पक्षाचा विस्तार करणार आहेत.

पिंपळनेर येथे पानमसाल्यासह १२ लाखांचा मुद्देमाल जप्त

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

येथील कुडाशी रोडलगत मराठा दरबार हॉटेलजवळ रविवारी (ता. ४) रात्री साडेअकराच्या सुमारास पिंपळनेर पोलिस ठाण्याच्या पोलिसांना पेट्रोलिंग करत असताना मटका तस्करी करणाऱ्या वाहनासह अकरा लाख ८० हजार ७७८ रुपये किमतीचा मुद्देमाल पिंपळनेर पोलिसांनी जप्त करत दोन संशयितांना ताब्यात घेतले.

पिंपळनेर पोलिस ठाण्याच्या पोलिसांना पेट्रोलिंग करत असताना वाहनात (एमएच १४, व्हीजे ०३२८) प्रतिबंधित पानमसाला व सुगंधित तंबाखूची विक्रीसाठी वाहतूक करत असल्याचे आढळले. पोलिसांनी वाहनचालकाला त्याचा परिचय विचारला असता त्याने त्याचे नाव मुक्तार अहमद मुंजर अहमद (वय ४२, रा. मालेगाव किल्लाजवळ, जि नाशिक) असे सांगितले. दुसऱ्या व्यक्तीचे नाव अफजल अहमद मोहमद शफिक असे आहे. पोलिसांनी वाहनाची तपासणी केली असता पानमसाला, तंबाखूचा साठा मिळून आला. या प्रकरणी पानमसाला व सुगंधित तंबाखूची वाहतूक करणारा चालक, मुद्देमाल मालक, वाहनाचा मालक, पुरवठादार व मुद्देमाल कोणाकडे जात आहे.

विनोद वाईनशॉप हटविण्यासाठी संपूर्ण आंबेडकरी अनुयायांनी शहरात विविध ठिकाणी केला रास्ता रोको

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

धुळे शहरातील आंबेडकरी जनतेच्या अस्मितेचा विषय बनलेल्या विनोद वाईनशॉप हटविण्यासाठी संपूर्ण आंबेडकरी अनुयायांनी शहरात विविध ठिकाणी केला रास्ता रोको आंदोलन करून प्रशासनाची झोप उडवून दिली आहे. हे आंदोलन कोणत्याही पक्षाचे नसून सर्व आंबेडकरी अनुयायांचे आहे अशा भूमिकेतून या आंदोलनाची तीव्रता वाढली आहे. धुळे शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळयामागील विनोद वाईन शॉप हे अनेक वर्षांपासून सुरु आहे.

हे वाईन शॉप स्थलांतरीत करण्यासाठी अनेक पक्ष, सामाजिक संघटना यांनी वारंवार जिल्हा प्रशासनाकडे मागणी केली होती. मात्र जिल्हा प्रशासन याकडे दुर्लक्ष करीत आहे. त्याचाच एक भाग म्हणून दि. ५ फेब्रुवारी सोमवार रोजी धुळे शहरातील अनेक मुख्य रस्त्यांवर आंबेडकरी समाजाच्या वतीने रस्त्यावर उतरुन चक्काजाम आंदोलन करण्यात आले. मुंबई-नागपूर महामार्गावर, धुळे शहरातील फाशीपुल चौक, स्टेशन रोड, मनोहर टॉकीज जवळ, प्रकाश टॉकीज पारोळा रोड येथे, सुभाष चौक जुने धुळे, देवपूर येथे सावरकर पुतळ्याजवळ, नकाणे रोड आंबेडकर नगर, दत्त मंदिर चौक, वलवाडी येथे गोंदूर रोड, वाडीभोकर रोड, मिलिंद सोसायटी, कमलाबाई शाळा चौक, साक्री रोड येथे जे.के. ठाकरे दवाखान्याजवळ, अशा विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात रास्ता रोको करून विनोद वाईन शॉपला विरोध करण्यात आला. आंबेडकरी समाजाच्या भावना विनोद वाईन शॉपच्या विरोधात अधिक तीव्र होत असून धुळे जिल्हा प्रशासनाने लवकरात लवकर आंबेडकरी समाजाच्या भावना लक्षात घेऊन वेळीच विनोद वाईन शॉपचे स्थलांतर करण्यात यावे. अशी मागणी जोर धरत आहे. विनोद वाईन शॉपचे स्थलांतर लवकरात लवकर स्थलांतरीत करावे अन्यथा यापेक्षा ही तीव्र स्वरुपाचे आंदोलन करण्यात येईल. अशी आंबेडकरी अनुयायांची भावना व्यक्त होत आहे. सदरचे आंदोलन हे कोणत्याही पक्षातर्फे नसुन सार्वजनिक आंबेडकरी अनुयायांचे आहे. या आंदोलनाचे श्रेय कोणी एकाने घेऊ नये, अशी भूमिका आंदोलनकर्त्या आंबेडकरी अनुयायांची आहे.

पेपर लीक-चीटिंग केल्यास १० वर्ष शिक्षा, १ कोटी दंड

नवी दिल्ली । लक्ष महाराष्ट्र वृत्त

लोकसभेने मंगळवारी (६ फेब्रुवारी) सरकारी भरती परीक्षांमधील पेपरफुटी आणि चीटिंग रोखण्यासाठी 'चीटिंग विरोधी' विधेयक मंजूर केले. यानुसार, परीक्षेचे पेपर लीक करण्यासाठी किंवा उत्तरपत्रिकांमध्ये छेडछाड करण्यासाठी अधिकाऱ्यांशी संगनमत करणाऱ्यांना १० वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि १ कोटी रुपयांचा दंड होऊ शकतो.

याआधी, मंगळवारी संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पाचव्या दिवशी, जम्मू-काश्मीरच्या स्थानिक निवडणुकांमध्ये (महानगरपालिका आणि पंचायत) आरक्षणावरील चर्चेने सभागृहाचे कामकाज सुरू झाले. केंद्रीय गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांनी सोमवार, ५ फेब्रुवारी रोजी लोकसभेत जम्मू आणि काश्मीर स्थानिक संस्था कायदे (दुरुस्ती) विधेयक २०२४ सादर केले होते. येथे, राज्यसभेत संविधान (अनुसूचित जमाती) आदेश (दुरुस्ती) विधेयक २०२४ आणि संविधान (अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती) आदेश (सुधारणा) विधेयक २०२४ वर चर्चा सुरू झाली.

राज्याची बेअब्रू...

गुन्हेगारी प्रवृत्तींनी राजकारणात कसा शिरकाव केला आहे हे गोळीबाराच्या घटनेतून दिसले. आमदार गायकवाड यांना अटक झाली, मात्र त्यांच्यावर तातडीने पक्षांतर्गत कारवाई करावी, असे भाजपला वाटले नाही!

भाजपचे कल्याण पूर्व मतदारसंघातील आमदार गणपत गायकवाड यांनी पोलिस ठाण्यात आपल्या राजकीय प्रतिस्पर्ध्यावर गोळ्या झाडल्या. उल्हासनगरमधील ही घटना महाराष्ट्राच्या राजकीय क्षेत्राच्या अधः पतनाचा नमुना होय. लोकप्रतिनिधी, काही मंत्री, वरिष्ठ स्तरापासून स्थानिक पातळीपर्यंतचे अनेक नेते, यांच्या बेजबाबदार विधानांतून राजकारणाचा घसरलेला स्तर याआधीच राज्यातील नागरिकांना समजून चुकला आहे. गायकवाड यांनी त्यापुढची मजल मारून खळबळ उडवून दिली. 'आपल्याला कृत्याचा पश्चात्ताप होत नाही', असे ते म्हणत आहेत! शिवसेनेच्या एकनाथ शिंदे गटाचे शहरप्रमुख महेश गायकवाड यांना आमदार गायकवाड महाशयांनी पोलिस ठाण्यात गोळ्या घातल्या. शिंदे यांच्या मदतीने भाजपने राज्यात युतीचे सरकार आणले खरे; पण मनोमीलन झालेले नाही. कल्याण लोकसभा मतदारसंघावरील दाव्यावरून भाजप आणि शिंदे गटात युद्ध सुरू आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे चिरंजीव डॉ. श्रीकांत शिंदे कल्याण लोकसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करतात. या मतदारसंघात शिंदे गटाला कोणत्याही प्रकारे सहकार्य न करण्याचा आणि शिंदे गटाच्या कार्यक्रमांवर बहिष्कार टाकण्याचा ठराव कल्याणमध्ये भारतीय जनता पक्षाने केला होता. लोकसभेसाठी भाजप कार्यकर्ते सांगतील तोच उमेदवार मान्य केला जाईल, ही भूमिका घेत भाजपच्या स्थानिक पदाधिकार्यांनी खासदार शिंदे यांच्याविरोधात रणशिंग फुंकले. एका पोलिस निरीक्षकाच्या बदलीवरून भाजप आणि शिंदे गटातील वाद एवढा चिघळला की शिंदे यांनी खासदारकी सोडतो, असे उद्वेगाने सांगितले. कल्याणमध्ये भाजपने शिंदे गटाविरुद्ध घेतलेल्या आक्रमक भूमिकेमागे आमदार गायकवाड होते. ते आणि शिंदे गटाचे शहरप्रमुख महेश गायकवाड यांच्यात विकासकामांच्या विषयावरून मतभेद विकोपास गेले होते.

कृत्याचा पश्चात्ताप नाही

वादाचे आणखी कारण म्हणजे जागेचे व्यवहार. रुग्णालयात जीवरक्षक प्रणाली असते. राजकारणात प्रवेश केलेल्या भूमाफियांच्या अस्तित्वासाठी हे व्यवहार त्याचप्रकारची भूमिका बजावतात. आपण वारंवार सांगून देखील पक्षाच्या ज्येष्ठांनी डोळेझाक केली, असे सांगत गायकवाड यांनी आपल्या धक्कादायक कृत्याचे समर्थन करण्याचा प्रयत्न केला आहे. एक लोकप्रतिनिधी प्रतिस्पर्ध्यावर गोळ्या झाडतो, यातून सत्ताधार्यांबद्दल नकारात्मक संदेश गेला आहे. 'राजकीय टोळीयुद्ध' याच शब्दांत त्या घटनेचे वर्णन करता येईल. कायदा आणि सुव्यवस्था ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नाही, ती जबाबदारी तेवढीच सत्ताधार्यांची आहे. याला नख लावणार्या आमदाराच्या कृत्याचा जेवढा निषेध करावा तेवढा कमी होईल. तिसर्यांदा लोकसभा निवडणूक जिंकण्यासाठी भाजपने कंबर कसली आहे. ४८ पैकी ४५ जागा भाजप आणि मित्र पक्ष जिंकतील, असे मागे केंद्रीय गृह मंत्री अमित शहा म्हणाले होते. शिंदे यांच्या मदतीमुळे महाविकास आघाडीला धडा शिकवता आला; पण निवडणुका जिंकता येतील का? याबद्दल भाजपमध्ये संभ्रमावस्था कायम राहिल्याचे दिसते. यातूनच राष्ट्रवादी काँग्रेस फोडून बळ वाढविण्याची खेळी झाली. आता स्थिती अशी आहे की भाजप ना पूर्णपणे शिंदे गटावर विसंबून राहू शकतो, ना अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीवर! निवडणुकीच्या तोंडावर कोणालाच न दुखावण्याची भूमिका असल्याने कल्याण आणि परिसरातील वादावर भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी मौन बाळगणे पसंत केले. परिणामी वाद मिटला नाहीच, उलट आपल्या पक्षाच्या लोकप्रतिनिधीने केलेल्या गोळीबाराबद्दल पक्षाला मतदारांना उत्तर देण्याची वेळ आली. शिवसेना अखंड असताना ज्या जागा जिंकल्या त्यावर शिंदे गटाचा दावा असला, तरी भाजप जे देईल तेच शिंदे यांना स्वीकारावे लागेल. युतीत एकोप्याचे चित्र आहे हे भासविण्यात राज्यपातळीवर भाजप आणि शिंदे गट कायम दक्ष राहिले. मात्र, भाजप आमदाराने केलेल्या गोळीबारामुळे ते चित्र किती फसवे आहे, हे राज्यासमोर आले आणि महाराष्ट्राची पुरती बेअब्रू झाली.

स्फूर्तीमाता रमाबाईंना त्रिवार वंदन

आनंद गावच्या गाव कुसा बाहेरच्या वस्तीत राहणार एक अतिशय गरीब कुटुंब भिकू धोत्रे. वनंदगावकर आणि रुक्मिणी बाई या परिवारात ०७ फेब्रू. १८९८ रोजी रमाबाईंचा जन्म झाला. भिकू धोत्रे यांची परिस्थिती अतिशय हलाखीची होती. गौरी (अक्का), रमा आणि शंकर अशी ही तिघे भाऊ बहीण होते. अति परिश्रमामुळे रखमा आजारी पडली, आणि त्यातच तीचा जीव गेला. भिकू छातीचे दुखणे असताना देखील आपल्या तीन मुलांसाठी दाभोळ बंदरावरून माशाच्या पेट्या वाहण्याचे जड काम भिकुने सुरूच ठेवले. वडिलांची दयनीय परिस्थिती पाहून जमा देखील आई प्रमाणे जंगलात जाऊन शेण सरपंन गोळा करायची, आणि त्याच्या गोवऱ्या बनऊन त्या विकायची. आलेल्या पैशातून आपल्या कुटुंबाला हातभार लावायची. अशातच एकदा भिकूला छातीत दुखू लागले .त्यांना रक्ताच्या ऊलट्या झाल्या . त्यातच त्याचा जीव गेला. गौरी, रामू आणि शंकर हे तीनही भाऊ पोरगी झाले त्यानंतर त्यांचा सांभाळ त्यांची काका व मामा यांनी केला. त्या काळात मुला मुलींचे लग्न आहे हे लहान वयातच होत होते. इकडे भीमराव मॅट्रिकची परीक्षा पास झाल्यानंतर त्यांच्या विवाहाचा विचार सुभेदार रामजी करू लागले. भायखळ्याच्या मच्छी बाजारात रमा आणि भीमराव यांचा विवाह संपन्न झाला. विवाहाची वेळी रमाचे वय नऊ वर्ष व भीमरावजींचे वय १७ वर्षे होते. शांत, सच्छिल, सदवर्तनि स्वभावामुळे रमाबाईंनी सर्वांची मने जिंकली. भारतीय स्त्रीचा आदर्श साध्वी रमाईंनी जराही ढळू दिला नाही. मोठ्या माणसांबरोबर आदबीने वागणे, त्यांचा योग्य मान सन्मान राखणे, पतीची मर्जी राखून सेवा करणे, शील राखणे याची रमाला चांगली जाणीव झाली होती. भीमरावांनी दिलेल्या शिक्षणामुळे रमाबाई अधिक हुशार झाल्या. अर्थशिक्षित असल्या तरी आपलां पती उच्च पदवीधर आहे याबद्दल त्यांना सार्थ अभिमान होता. रमाबाई आपल्या पतीसोबत बोलताना नेहमी त्यांना साहेब म्हणूनच आवाज देत. असत तर भीमराव रमाबाईंना रामू म्हणून प्रेमाने आवाज देत. बाबासाहेबांनी विदेशातून रमाबाईला पाठवलेल्या प्रत्येक पत्रात प्रिय रामू असा उल्लेख दिसून येतो. पती-पत्नीच्या नात्यात संहृदयतेची भावना होती हे यावरून दिसून येते. शैक्षणिक प्रगती प्राप्त करण्याची भीमरावांची प्रतिज्ञा होती. त्याचे स्फूर्ती स्थान म्हणजे साध्वी रमाबाई होत्या. आपल्या पतीच्या सुख सोयीसाठी त्यांचे खाणे- पिणे, कपडे याकडे त्या जास्त लक्ष देत नव्हत्या. भीमरावांना जेवण करताना बाजरीची भाकरी आणि कांदा मिळाला तर त्यांना इतर कोणत्याही पंचपकवानांची आवश्यकता वाटत नव्हती. आपले पती कॉलेजमधून घरी आल्यावर त्यांना फळ आणि चहा नेऊन देणे, रात्रीच्या वेळी जेवण वाढून त्यांच्या अभ्यासिकेत नेऊन ठेवणे, पिण्याच्या पाण्याचा - तांब्या ग्लास इत्यादी साहित्य नेऊन ठेवणे अशी पतीची सर्व कामे रमाबाई आपल्या अभ्यासात व्यत्यय न आणता करीत असत. १२ डिसेंबर १९१२ रोजी रमाबाई आणि भीमराव यांच्या संसार वेलीवर एक सुंदर फुल उमल. त्यांना पुत्ररत्नचां लाभ झाला. याच वेळेस भीमराव आंबेडकर बी.ए. पास झाले होते. आणि दुसरीकडे त्यांना पुत्ररत्न प्राप्त झाले होते. हा दुग्धशर्करा योग होता. रामजी बाबांना देखील खूप आनंद झाला. बडोदे संस्थांचे प्रमुख सयाजीराव गायकवाड यांनी भीमरावांना शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मिळवून दिली. आणि कराराप्रमाणे भीमराव पदवीधर झाल्यानंतर बडोदे संस्थानात चांगल्या हुद्द्यावर नोकरी करू लागले. नोकरीला पंधरा दिवस देखील झाले नसतील तशातच ०२ फेब्रुवारी १०१३ भीमरावांचे वडील रामजी आंबेडकर यांचे निधन झाले. रमाबाईंना हा फार मोठा धक्का होता.०४ जून १९१३ रोजी पुढील शिक्षणासाठी भीमरावजी जहाजाने अमेरिकेला गेले. २० जुलै १९९३ रोजी भीमराव न्यूयॉर्क शहरात सुखरूप पोहोचले. भीमरावांना स्कॉलरशिप देऊन उच्च शिक्षणासाठी विदेशात पाठवायचे ही बडोद्याच्या सयाजीराव महाराजांची कल्पना होती. उच्च प्रतीच्या ज्ञानसाधनेसाठी भीमराव जेव्हा मिळाला गेले तेव्हा भूक तहान हरपून १८-१८ तास त्यांनी अभ्यास केला. भरपूर वाचन, चिंतन, मनन केले. स्वतःचा खर्च काटकसरीने करून उरलेले थोडे पैसे भिमराव आपल्या रामूला पाठवीत होते. १९१६ मध्ये त्यांनी डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी ही उच्च पदवी प्राप्त केली. भारताच्या राष्ट्रीय नफ्याचा वाटा एक ऐतिहासिक प्रूथक्करणात्मक परिशिलन या विषयावर प्राध्यापक सेलिगमन यांच्या मार्गदर्शनाने त्यांनी प्रबंध लिहिला. यापुढे भिमरायांना डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर म्हणून ओळखले जाऊ लागले. सुभेदार रामजी बाबा व बाबासाहेबांची ज्येष्ठ बंधू आनंदा यांचे १९१३ साली निधन झाले.

घरातील दोन्ही मिळवत्या व्यक्तींच्या निधनामुळे आर्थिक आवक बंद झाली. त्यामुळे आंबेडकर कुटुंबांवर मोठी आपत्ती आली. मात्र रमाईंनी परिस्थिती पुढे हार मानली नाही. त्यांनी रानावनात जाऊन शेण गोळा केले. त्याच्या गोवऱ्या थापल्या. व त्या गोवऱ्या वाळल्यावर जाऊन त्या विकायच्या. येणार्या पैशातून आपले कुटुंबाचा चरिथार्थ चालवला. बाबासाहेब विजेच्या शिकण्यासाठी गेलेली होती इकडे संसाराचा काढा अतिशय गरिबीच्या परिस्थितीतून रमाई जात होत्या त्यावेळेस बाबासाहेबांनी या महिला पत्र लिहिले. त्या पत्रात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, प्रिय रामू, नमस्ते ! पैशासंबंधाने तजबीज करीत आहे. मी इथे अन्नास मौताद झालो आहे. तेव्हा मज जवळ पाठविण्यास काही नाही. तरी पण तुमचा बंदोबस्त करीत आहे. वेळ जर लागला तर आणि तुझे पैसे संपले तर दागिने मोडून तुमचे काम भागवा. मी आल्यावर तुमचे दागिने भरून देईल. अतिशय थोड्या पैशात रमाबाई ६ ते ७ लोकांचा संसाराचा गाडा हाकत होत्या. अशातच काही वेळा त्या अर्धपोटी देखील झोपत होत्या. मात्र त्यांनी परिस्थितीबाबत कधीही भीमरावजींकडे तक्रार केली नाही. स्कॉलरशिप बंद झाल्यामुळे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे २१ ऑगस्ट १९१७ रोजी भारतात परत आले. रमाबाईंना अतिशय आनंद झाला. १९१८ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मुंबई येथील सिडणेहॅम महाविद्यालयात अर्थशास्त्राच्या प्राध्यापकाची नोकरी मिळाली. त्यांना रुपये ४५०/- मासिक वेतन मिळू लागले. आपली पतीराज एकदाचे संसाराला लागले म्हणून रमाबाई आनंदाने खुलून गेल्या. त्यांना वाटले, आता आपले घरी पती घरी आले. ते संसारात रमतील. आपल्याला त्यांची सेवा करण्याचा योग येईल. बाबासाहेबांना प्राध्यापकाची नोकरी लागली होती त्याचा पहिला पगार रुपये ४५०/- त्यांच्या हातात मिळाला. तो त्यांनी रमाबाई जवळ दिला. रमाबाईंनी तोआपल्या सासर यांच्या फोटो समोर ठेवला. रमाबाईंनी दुसऱ्या दिवशी बाबासाहेबांच्या परवानगीने त्या पैशातून मुलाबाळांना, जावा- नणंद यांना स्वतः बाजारात जाऊन नवीन कपडे आणले. सर्वांना गोड पदार्थ करून खाऊ घातले. आणि स्वतःच्या संसारासाठी देखील काही आवश्यक वस्तू खरेदी केल्या. आपले घर प्राध्यापकाच्या योग्यतेचे शोभेल वाटावे म्हणून त्यांनी काही वस्तू घेतल्या. त्यातच १५ दिवसात त्यांचा सर्व पैसा संपून गेला. पुढचे पंधरा दिवस कसे काढायचे याची चिंता बाबासाहेबांना व रमाबाईना पडली होती. आपल्या डोळ्यासमोर आपण कमावलेला पैसा झटक्यात उडून गेला. यामुळे बाबासाहेब थोडे दुःखी देखील झाले होते. त्यांनी त्याबाबत रमाबाईंना समजावून देखील सांगितले.

आपल्या पतीचे विचार ऐकून रमाबाईंच्या स्त्री सुलभ भावनांना एक मोठा जबरदस्त धक्का बसला. रमाबाईंची संसार विषयक सारी स्वप्न धुळीला मिळाली. इतर गृहिणींचे सुखी संसार आणि त्यांच्या पतींची संसारा विषयक मते पाहून आपल्याही संसार असाच आदर्श असावा असे विचार त्यांच्या मनाला चाटून जात. कधी कधी त्या वैतागून देखील जात असत. अश्याच एका प्रसंगी बाबासाहेब वैतागलेला रमाबाईला प्रेमाने म्हणाले, अगदी डोळ्यासमोर आलेलं संसार सुखाचे मायावी मोहजाळ बाजूला सोडून तुझ्या मामांची अखेरची इच्छा आठव! म्हणजे माझ्या म्हणण्याचा मतीतार्थ तुला कळेल. केवळ पिताजींचे स्वप्न साकार करण्यासाठी लंडनला जाऊन मला बॅरिस्टर ची पदवी उत्तीर्ण व्हावयाची आहे. बाबांची मनीषा पूर्ण करावयाची आहे. माझ्या कोट्यावधी अस्पृश्य बांधवांच्या अन्यायाला जगाच्या वेशीवर टांगायचे आहे. त्याकरिता अद्ययावत कायद्याचे ज्ञान प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. बॅरिस्टर झालो म्हणजे कुणाचीही गुलामी न करता, वकील म्हणून मला स्वतःच्या पायावर स्वाभिमानाने उभे राहता येईल, आणि खऱ्या अर्थाने समाजकारण व राजकारण निर्धास्तपणे करता येईल. बाबासाहेबांचे विचार ऐकून स्वामी निष्ठा जागृत झाली. त्यांना पतीच्या विचाराची उंची आणि महानता कळून आली. संसारा विषयक भ्रामक स्वप्नांचे मोहपास झूगारून तात्काळ त्या स्वाभिमानाने उदगारल्या, साहेब आपण मुळीच काळजी करू नका. आपणास आपल्या समाजाच्या कल्याणाचा संसार करावयाचा आहे. मामांची थोर स्वप्न साकार करावयाची आहेत . आपल्या इच्छेच्या विरुद्ध मी जात नाही. यापुढे साहेब मी आपल्या ध्येयपुतीसाठी पूर्ण सहकार्य करेल आपण निश्चित असावे. रमाबाईंच्या अश्या स्वभावामुळे बाबासाहेब रमाबाईंना आपले स्फूर्तीस्थान समजत.

बाबासाहेबांचा दुसरा मुलगा गंगाधर आजारी पडला. पहिले पैसे दिल्याशिवाय दुसरी औषधे मिळणार नाहीत असे दुकानदार म्हणाला. नगरपालिकेचे औषधे घेऊन बघितली. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. औषध विक्रेत्यांनी औषधी दिली नाहीत त्याप्रसंगी काही लोकांनी रमाईला पैसे देऊ केले. पण स्वाभिमानी रमाईने कुणाकडूनही पैसे घेतले नाहीत.त्यामुळे गंगाधर यास प्राणास मुकावे लागले.

लंडन होऊन बॅरिस्टर ची पदवी घेऊन डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर भारतात आले. १९२३ जुलै महिन्यापासून त्यांनी भारतात वकिलीचा व्यवसाय सुरू केला. हळूहळू त्यांना कामे मिळू लागली. व्यवसायात चांगला जम बसू लागला. पैसा मिळू लागला. त्यामुळे घरची परिस्थिती सुधारली. एकदा वकिलीची फी म्हणून बॅरिस्टर बाबासाहेबांना रोख रू.३००/- मिळाले. तेव्हा ते सर्व रुपये त्यांनी रुमालात बांधून घरी आणून आपल्या पत्नीला म्हणजे रमाईला स्वाधीन केले . एवढे रुपये एकदम पाहून रमाईचा आनंद गगनात मावेनासा झाला. कारण इतके रुपये त्यांनी जीवनात कधीच पाहिले नव्हते. ती सर्व रक्कम दिवंगत रामजी बाबांच्या प्रतिमेसमोर ठेवली. आणि साहेबांची अशीच प्रगती व्हावी म्हणून त्यांचा आशीर्वाद मागितला. जसा पैसे मिळायला लागले तसे बाबासाहेबांनी पुस्तकं विकत घेण्यास सुरुवात केली. बाबासाहेब वाचनात एवढे तल्लीन होऊन जायचे की त्यांना जेवणाची सुद्धा आठवण येत नसे. अनेकदा रमाई त्यांच्यासमोर ताट वाढून ठेवत असत. मात्र बाबासाहेबांचे त्या ताटाकडे लक्ष नसायचे, किंवा लक्ष गेल्यावर बाबासाहेब म्हणायचे , एवढी दोन पान वाचून घेऊ दे, मग आपण जेवू.

एक दिवस पत्नीच्या आग्रहावरून बाबासाहेबांनी वाचन बंद करून जेवणास सुरुवात केली. परंतु जेवता जेवता रमाईंना म्हणाले, अगं मी संसारात लक्ष देत नाही, असे माझ्या नावाने सारखी ओरडत असतेस .मग मी काय करावे असे तुला वाटते ? त्यावर रमाबाई सहजतेने उतरल्या, अहो घरात भाजीपाला, तेल, मीठ ,गहू, तांदूळ वगैरे वस्तू लागतात. त्याकडे तरी नवऱ्याने लक्ष दिले पाहिजे. कधी मुलांना जवळ करावे, त्यांना प्रेम द्यावे. बायकोशी दोन शब्द प्रेमाने बोलावे. परंतु तुमचे मांत्र सर्व मूलखा वेगळे ! येऊन जाऊन तुमची ती जाड जूड पुस्तक. त्याचे सतत वाचन.

रमाबाईंनी डोळ्यात अश्रू आणून आपली अनेक दिवसांची खंत पतीसोबत व्यक्त केली. तेव्हा खऱ्या परिस्थितीची जाणीव होताच बाबासाहेबांसारख्या महामानवाचे डोळे पानावले ,आणि मोठ्या प्रेमाने ते पत्नीला म्हणाले, ' रामू तू अशी साध्वी आहेस म्हणूनच मी असा राहू शकतो. पती-पत्नीची परस्परांतील अशी श्रद्धा व निर्व्याज प्रेम जगात क्वचितच दिसून येईल.

जीवनातील बऱ्या वाईट प्रसंगाचा अनुभव घेत डॉक्टर बाबासाहेबांच्या ध्येयवादी पतीच्या सहवासात साध्वी रमाबाईंचे दिवस जात होते. त्यांच्या खडतर जीवन यज्ञामध्ये आपल्या त्यागाच्या समिधा श्रद्धेने समर्पित करून साध्वी रमाबाई बाबासाहेबांना यथामती व यथाशक्ती सहकार्य करीत असत. डॉक्टर बाबासाहेबांसारख्या पुरुषांसोबत संसार करीत असताना रमाबाईंना एकूण पाच मुले झाली. परंतु त्यापैकी पहिला पुत्र यशवंत सोडून बाकीची चार मुले अकालीच कालवश झाली. गंगाधर,रमेश, इंदू व राजरत्न हि त्या अभागी बालकांची नावे होत. लहान मुलगा राजरत्न हा बाबासाहेबांचा फार लाडका होता. राजरत्न आपल्या वडिलांची हुबेहुब प्रतिमा होता. त्या गुरगुटीत गौरवणीय बालका विषयी बाबांच्या अंतकरणात नितांत प्रेम होते. एके दिवशी राजरत्नलां ताप आला. त्याला डबल निमोनिया झाला. तेव्हा मुंबईतील तज्ञ डॉक्टरांना बोलावण्यात येऊन , महागडी औषधी दिली गेली. मात्र राजरत्न ची तब्येत अधिकच खालावत गेली. व १९ जुलै १९२६ रोजी सकाळी १० वाजता महत्त्वाच्या केस संदर्भात डॉक्टर बाबासाहेब हायकोर्टात गेले. त्याच दिवशी दुपारी ०२ वाजता राजरत्नने जीव सोडला. कोर्टातून परत आल्यावर बाबासाहेबांना ही दुःखद वार्ता कळली. तेव्हा ते दुःखतिरेकाने दुःखातील जणू वेडे झाले. एखाद्या अजान बालकां प्रमाणे ते ओक्साबोक्सी रडू लागले. लाडक्या राजरत्नच्या अकाली मृत्यूमुळे बाबासाहेब यांचे मन शतशः विदीर्ण झाले. राजरत्न च्या मृत्यूनंतर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व रमाईची तब्येत वारंवार बिघडू लागली. मार्च १९२७ मध्ये बाबासाहेबांना मलेरिया झाला. त्यात तीन-चार दिवस त्यांनी अण्णाला देखील स्पर्श केला नाही. तेव्हा साध्वी रमाईंनी देखील अन्नपाण्याचा त्याग केला. नंतर बाबासाहेब आंबेडकरांचा ताप जेव्हा उतरला तेव्हाच रमाबाईंनी आपले उपोषण सोडले. यावरून प्रतिनिष्ठ रमाबाई आपल्या ध्येयवादी पतीच्या संघर्षमय जीवनाची कशा एकरूप झाल्या होत्या हे लक्षात येते.

कालांतराने बाबासाहेबांनी अस्पृश्य समाजातील स्त्रियांची स्वतंत्र संघटना उभी केली. महिलांमध्ये जागृती निर्माण करण्याचे ठरवले. रमाबाईंना लिहायला वाचायला शिकवले. चळवळीत प्रत्यक्ष सहभाग घ्यायला पाहिजे, मुद्देसूद व प्रभावी भाषण कसे करावे याचे ज्ञान दिले. लोखंडाला पोलिसाचा स्पर्श झाल्यास लोखंडाचे सोने झाल्याशिवाय कसे राहील ! रमाबाईंना भाषणाची कला लवकर चांगल्या प्रकारे अवगत झाली. आता रमाबाई सामाजिक कार्यकर्त्या म्हणून ओळखले जाऊ लागल्या.

७ सप्टेंबर १९३१ पासून लंडनला दुसरी गोलमेज परिषद सुरू झाली. बाबासाहेब परिषदेला उपस्थित राहिले. दुसरी गोलमेज परिषद आतोपून बाबासाहेब जेव्हा भारतात आले तेव्हा त्यांच्या स्वागतासाठी सर्व जनसमुदाय एकत्रित झाला होता. रमाबाई देखील हातात मोठा हात घेऊन बाबासाहेबांच्या आगमनाची वाट पाहत होत्या. बाबासाहेब आल्यावर सर्वात पहिले समता सैनिक दलाने त्यांना मानवंदना दिली. शेकडो हार त्यांच्या गळ्यात पडले. रमाबाई आपल्या पति वरील जनतेचे अफाट प्रेम प्रथमच पाहत होत्या. रमाबाईंनी आपला हार शेवटी बाबासाहेबांच्या गळ्यात घातला, आणि तो देखील त्यांच्या चरणावर नजर लांऊनच घातला. अभिनंदनच्या व सत्काराच्या जाहीर सभेत रमाबाईंना सर्वात शेवटी हार घालण्याविषयी व पायाकडे बघण्याचे कारण विचारण्यात आले. तेव्हा न डगमगता त्या बोलल्या, साहेबांनी दलितांच्या उद्धाराचे कंकण हाती बांधले आहे. मी त्यांची अर्धांगिनी असल्यामुळे त्या कंकणाला माझी नजर लागू नये म्हणून मी पतीराजाच्या पदकमलाकडे बघत साहेबांच्या गळ्यात हार घातला. ही स्वामीनिष्ठ, प्रतिनिष्ठ रमाबाईंचे तर्कपूर्ण उत्तर ऐकून सत्काराच्या सभेतील सर्वच लोक आश्चर्यचकित झाले. आणि प्रत्येक व्यक्ती रमाबाईंच्या बुद्धिमत्तेची मुक्त कंठाने प्रशंसा करू लागले.

मुंबईच्या दादर विभागातील हिंदू कॉलनी परिसरात राजगृह नामक देखणी टोलेजंग इमारत बांधण्यात आली. आपल्या स्वतःच्या अफाट ग्रंथालयाची नीट व्यवस्था व्हावी म्हणून या ईमारतीची योजना आखली गेली होती. स्वतः जमवलेल्या ग्रंथासाठी स्वतंत्र भव्य इमारत बांधणारा ज्ञानवेडा जगाच्या पाठीवर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिवाय दुसरा कुणीही आढळणार नाही. या इमारतीच्या गृहप्रवेशाच्या वेळेस येणाऱ्या सर्व लोकांचे माता रमाई यांनी स्वागत केले. मात्र त्यानंतर त्या सतत आजारी पडू लागल्या. सुमारे दीड महिन्यापासून त्या अंथरुणाला खिळून होत्या. त्यांची काया म्हणजे केवळ हाडांचा एक जिवंत सांगाडा बनली होती. रमाबाईंचा ताप काही उतरत नव्हता. डॉक्टरांनी देखील अथक प्रयत्न केले. बाबासाहेबांना मुंबईहून बोलून घेण्यात आले. बाबासाहेब येऊन रमाईच्या उशाशी बसले. २७ मे १९३५ रोजी रमाबाईंनी डोळे उघडले. आपल्या उशाशी बसलेल्या साहेबांना पाहून त्यांना मानसिक समाधान झाले. पती राजाकडे पाहून त्यांनी हास्य केले. तेव्हा बाबासाहेबांच्या डोळ्यात अश्रू मावत नव्हते. त्यातच रमाईंच्या छातीत एकदम कळ आली. वेदनांनी त्या बिछाण्यावर तरफडू लागल्या. अशाही परिस्थितीत त्या बाबासाहेबांना म्हनाल्या, साहेब रडू नका. मला हसत हसत निरोप द्या. तशाही परिस्थितीत रमाबाईंनी आपला ऊजवा हात वर करून साहेबांचे अश्रू पुसण्याचा निषफळ प्रयत्न केला. परंतु तो हात खळखन खाली पडला. त्यावेळेस घड्याळात बरोबर सकाळचे नऊ वाजले होते. त्यावेळेस या माऊलीची जीवनज्योत मालवली. अस्पृश्य समाजाच्या स्फूर्ती मातेची प्राणज्योत एकाकी विझली होती. माता रमाई आम्हा सर्वांना पोरक्या करून गेल्या. माता रमाबाईंना विनम्र अभिवादन.

शब्दकोडे-३१३



आडवे शब्द :

१. देव्हारा ५. गोदाम ८. विसराळू १२. जंगलाचा राजा १३. लोकसभा १४. किंमत १५. मृत्यू (हिंदी) १६. मारुती, ---- बली १८. तह, सामोपचाराने भांडण मिटणे २०. श्रीकृष्णाचा पालक पिता २२. जपानी चलन २३. मोठी नदी २४. परीक्षा, निवड २६. लपविणे २७. छाया २८. आवडता, प्रिय ३०. धमनी ३१. ठिकाण, स्थान ३३. निष्णात, वाकबगार ३५. सापाची एक जात ३६. युद्धाची गाणी ३९. पुरुष, शूर पुरुष ४०. तरुण, सैनिक ४१. बोलणे ४३. अंजन ४४. नवल वाटावे अशी कामगिरी ४५. वर्ष ४६. अटीची भाषा ४८. समीक्षक ४९. एक हजार किलो ५०. उचलण्यास अवघड ५१. नमुना ५३. सरसरीत ५४. नवरा (ग्रा.) ५६. तीव्र रेचक ५९. आश्वासन ६१. मिरवणूक ६२. अजाणता ६४. दमदाटी ६५. कमळ, हंस ६६. कचऱ्याची जागा ६८. उत्कर्षाचा काळ ७३. अट, शर्त ७४. पावसाची वाट पाहणारा पक्षी ७५. मनाचा ओढा ७६. फुलपाखराची प्रथमावस्था

उभे शब्द :

१. देवकीचा पुत्र, श्रीकृष्ण २. अरण्य ३. खानदान ४. मातीचा कण ५. पहिला ऋतू ६. विशेष ७. एखाद्याच्या वतीने बोलणे ९. अखंड १०. भोळा, भाबडा ११. घट्टच्या विरुद्ध १४. विहिरीतून बैलाच्या सहाय्याने पाणी काढण्याचे साधन १५. गप्प राहणे १७. अनेक रंगाचे १९. कंबरभोवतीचा चांदीचा दागिना २१. मजबूत, टिकाऊ, जाड २२. राबता ये-जा २३. जाण्या-वागण्यात अनुभवाला येणाऱ्या नऊ भावना २४. हालचालीवरील नजर २९. अस्थिर, हलणारे ३२. हवेतील थंडावा ३३. कट्टा, चबुतरा ३४. भूतकाळ ३५. हात आणि पंजा यांचा सांधा ३७. प्रवासातील टप्पा ३८. भेदक, पोळणारे ४०. वस्तू गोळा करणे ४२. पांढरपेशा, नोकरी करणारा ४५. वर्षानुवर्षे ४७. रुक्ष ४८अ. मनातील उलघाल ५२. लाजणारा ५३. गोलंदाजांना साथ न देणारी खेळट्टी ५४. मेघ, ढग, दाट ५५. उघडउघड, स्पष्टपणे ५७. प्रतिष्ठित ५८. पणजीचे राज्य ६०. अभाव, टंचाई ६१. अशिलाची बाजू मांडणारा ६२. प्रयत्न केले तर याचा नारायण होतो ६३. सकस, सत्ययुक्त ६५. तात्पर्य ६६. चषक ६७. झाडू ६९. शंकर ७०. बगळा ७१. नांगर ७२. उदर

शब्दकोडे-३१२ चे उत्तर

आडवे उत्तर

१.नामकरण ४.रसा ६.परिमल ८.तंग १०.रसना ११.सक्तमजुरी १२.वक्ष १३.तसदी १६.क्षमाशील १८.सर २०.खानदान २२.भाक २३.रवळनाथ २४.सालस २६.दर २७.खर २९.महामाया ३०.अंगत पंगत ३३.दानत ३६.परवा ३८.कसकस ४१.कानशील ४४.नानक ४५.तव ४६.लाड ४७.जानवे ४८.वसवस ५०.महिम ान ५१.नाव ५२.बाक ५४.लटकणे ५५.रटरट ५७.जट ५८.बालगीत ६०.रद ६२.कस ६४.कणीदार ६६.रन ६७.साफ ६८.आटपाटनगर ७०.मोकाट ७२.लोलक ७४.वाण ७५.वस्ताद ७६.वर्तन ७७.साव ७८.रमली ८०.रपेट ८१.लढाई ८२.ईर्ष्या ८३.वीतान

उभे उत्तर

१.नारळ २.मस ३.कनात ४.रक्तदान ५.साम ६.परीक्षक ७.लवलवणे ९.गजरथ १४.सखा १५.दीनदयाळ १७.शीर १८.सनातन १९.कलम २१.दार २२.भारत २५.सहाय्यक २७.खग २८.अंग ३०.अंजन ३१.पंगू ३२.तपन ३३.दावा ३४.तपोवन ३५.नकलाकार ३७.रकम ३९.सड ४०.सजावट ४१.कावेबाज ४२.शीव ४३.लसलस ४४.नासकवणी ४५.तमासगीर ४९.वट ५१.नारद ५३.कटकट ५६.टरफल ५८.बारका ५९.तनम धन ६१.नटवा ६३.सनगर ६४.करवली ६५.दामोदर ६७.सालोसाल ६९.पाणपोई ७१.टवटवी ७३.कसाई ७९.मठ्ठा

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
नंदुरबार कार्यालय - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

निधन वार्ता

नानासाहेब माणिकराव बैसाणे

धुळे । तालुक्यातील नगांव बु।।येथील माणिकराव लाला बैसाणे प्रगतीशिल शेतकरी व गाव, समाजात लोकप्रिय असलेले विनयशील व्यक्तीमत्व यांचे मंगळवार, दि. ०६ फेब्रुवारी २०२४ रोजी दुपारी ०१:२० मिनिटांनी बुध्दवासी झालेत. नानासाहेब हे सन १९६२ च्या ग्रामपंचायत मध्ये सदस्य म्हणून कार्यरत होते. नगांव विविध कार्यकारी सोसायटीचे संचालक म्हणूनही ते कार्यरत होते. आज रोजी पर्यंत त्यांचे वय ९६ वर्ष होते. त्यांची अंत्ययात्रा आज बुधवार, दि. ०७ फेब्रुवारी २०२४ रोजी कदमबांडे नगर (नगांवबारी) येथील वसंत माणिक बैसाणे यांच्या राहत्या घरापासून सकाळी १०:३० वाजता निघेल. नानासाहेबांचे मुळगांव नगांव येथील अमरधाम मध्ये त्यांच्यावर अंत्यसंस्कार होतील. त्यांच्या पश्चात अभिमन बैसाणे, अनिल बैसाणे, जगन्नाथ बैसाणे, अशोक बैसाणे, नाना बैसाणे, मनोज बैसाणे, नारायण बैसाणे, सुनील बैसाणे,अशोक बैसाणे, मिलिंद बैसाणे, संजय बैसाणे असा परिवार आहे.

मुलींचा जन्मदर वाढीसाठी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी : उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे

नाशिक । प्रतिनिधी

नाशिक विभागातील काही भागात मुलींचा जन्मदर कमी असल्याचे निदर्शनास आले असून आशा भागात जनजागृती कार्यक्रम राबविण्यात यावे. तसेच मुलींचा जन्मदर वाढीसाठी महिला दक्षता समितीच्या माध्यमातून कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना विधान परिषदेच्या उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिले.

विभागीय आयुक्त कार्यालयाच्या समिती कक्षात विधान परिषदेच्या उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली आदिवासी आश्रमशाळांमधील संरक्षणाविषयी आढावा तसेच नाशिक विभागात मुलींचा कमी होणारा जन्मदर, महिला व बालकल्याण विभागाच्या विविध योजना व त्यांची अंमलबजावणी, समाज कल्याण विभागाच्या विविध योजना व त्यांच्या अंमलबजावणी, महिला दक्षता समितीच्या कामातील सुधारणा आदि विषयांचा आढावा घेण्यात आला.

उप सभापती डॉ. गोऱ्हे पुढे म्हणाल्या की, नाशिक विभागात कमी होणारा मुलींचा जन्मदर चिंतेचा विषय असून आदिवासी बहुल भागात मुलींचा जन्मदर समाधानकारक आहे. विभागातील १३ तालुक्यांमध्ये मुलींचा जन्मदर कमी असल्याचे निदर्शनास आले असून ज्या ज्या भागात अवैध मार्गाने सोनोग्राफी सेंटर चालविले जात असतील आशी ठिकाणे फोकस करून कार्यवाही करण्यात यावी. तसेच जिल्ह्यातील अवैध गर्भपाताच्या प्रकरणांचा निकाल लवकर लागला पाहिजे त्यासाठी वेळोवेळी आढावा घेण्यात यावा. विभागीय आयुक्तांनी याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा. जिल्ह्यातील मुलींचा जन्मदर वाढविण्यासाठी पीसीपीएनडीटी कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी, असेही डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले.

महिलांच्या सक्षमीकरणासाठी केंद्र व राज्य शासनाच्यावतीने विविध योजना राबविण्यात येत आहे. या योजनांची जिल्हास्तरावर प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी नियोजन करण्यात यावे. तसेच पॉक्सो सारख्या कायद्यासंदर्भात माहिती होण्यासाठी पोलिसांच्यावतीने आदिवासी विभाग, समाज कल्याण विभाग, महिला व बाल कल्याण विभागातील अधिकाऱ्यांसाठी कार्यशाळा घेण्यात यावी, असे निर्देश उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिले.

मनोधैर्य योजनेतून महिलांना देण्यात येणाऱ्या शासकीय लाभाचा यावेळी डॉ. गोऱ्हे यांनी आढावा घेतला असून मनोधैर्य योजनेतील महिलांच्या पुनर्वसनासाठी देखील उपाययोजना करण्यात याव्या अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. गेल्या वर्षभरात नाशिक विभागात २५० बालविवाह रोखण्यात आले असून ही समाधानाची बाब असल्याचे डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले.

उभारी योजनेच्या माध्यमातून आर्थिक व मानसिक आधार

आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांसाठी राबविण्यात येणाऱ्या उभारी योजनेबद्दल डॉ.गोऱ्हे यांनी समाधान व्यक्त करून विभागीय आयुक्त राधाकृष्ण गमे यांचे अभिनंदन केले. उभारी योजनेच्या माध्यमातून आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देऊन त्यांना आर्थिक व मानसिक आधार देण्याचे काम ही योजना करत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी बैठकीस विभागीय आयुक्त राधाकृष्ण गमे, आदिवासी विकास आयुक्त नयना गुंडे, अहमदनगर जिल्हाधिकारी सिद्धराम सालीमठ, जिल्हाधिकारी जळगाव आयुष प्रसाद, जिल्हाधिकारी धुळे अभिनव गोयल, अपर पोलीस अधीक्षक आदित्य मिरखेलकर, पोलीस उपायुक्त प्रशांत बचाव, जिल्हा शल्य चिकित्सक चारुदत्त शिंदे, उपायुक्त (प्रशासन) रमेश काळे, महिला व बालकल्याण विभागाचे उपायुक्त चंद्रशेखर पगारे, आरोग्य उपसंचालक डॉ. कपिल आहेर, समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त माधव वाघ, सहायक आयुक्त देविदास नांदगावकर आदि अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. विभागातील जिल्ह्यांचे पोलीस अधीक्षक व समाज कल्याण अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

'बडी कॉप' सारखे उपक्रम राबविण्यात यावे

भरोसा सेल मुळे महिला दक्षता समितीचे काम थांबले असेल तर दक्षता समितीच्या काम अद्ययावत करून त्या पुन्हा सुरू कराव्यात. तसेच जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात आठवड्यातुन एकदा दुरदृष्यप्रणालीद्वारे भरोसा सेलची बैठक घेण्यात यावी. मुली व महिलांच्या संरक्षणासाठी 'बडी कॉप' सारखे उपक्रम राबविण्यात यावे, आशा सूचना डॉ. गोऱ्हे यांनी दिल्या.

महिलांच्या सक्षमीकरणासाठी प्रशिक्षणाचे आयोजन करावे

महिलांचे सक्षमीकरण होण्यासाठी जिल्ह्यातील आदिवासी विकास, समाज कल्याण विभागाचे वसतीगृह, आश्रमशाळांमधील शिक्षक व इतर अधिकारी, कर्मचारी यांना शासनामार्फत महिलांसाठी सुरू करण्यात आलेल्या नवीन योजना व महिलांविषयक असणारे कायदे यांची माहिती देण्यासाठी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात यावे. जेणेकरून आश्रमशाळा व वसतीगृहातील मुलींना देखील शासनाच्या योजनांची माहिती होण्यास मदत होईल. यासोबतच जिल्ह्यात विविध यंत्रणांमार्फत महिलांच्या सक्षमीकरणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजना, महिला बचत गट, भरोसा सेल, तसेच निवासी आश्रमशाळा अशा विविध विषयांचा आढावा घेवून त्यांचा सद्यस्थितीदर्शक अहवाल सादर करण्याच्या सूचनाही विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी संबंधित अधिकारी यांना दिल्या.

गणेशगांवला वाचनालयाचे उद्घाटन संपन्न

नाशिक

गणेशगांव येथे अनुआई भवन लोकार्पन व हभपश्री निवृत्ती महाराज सार्वजनिक वाचनालय अभ्यासिका उद्घाटन देवळाली मतदार संघाच्या आमदार सौ. सरोज आहिरे यांचे प्रमुख उपस्थीतीत व महाराष्ट्रातील नामवंत किर्तनकार गुरुवर्य हभपश्री ज्ञानेश्वर माऊली कदम यांचे हस्ते संपन्न होत आहे, यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून . ह.भ.प. जगदीश महाराज जोशी . श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वरचे मुरलीधर पाटील अ.भा.वारकरी मंडळ जिल्हाध्यक्ष हभप आण्णासाहेब महाराज आहेर हिसवळकर, ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, सहाय्यक ग्रंथालय संचालक नाशिक विभाग सचिन जोपुळे, राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाध्यक्ष विष्णुपंत म्हैसधुने, तालुका अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस राजाराम पा.धनवटे, सौ .मालती डाहाळे सरपंच. गणेशगाव उप अभियंता सा .बां.विभान नाशिक नामदेव खेडकर, सा . बां. वि.शाखा अभियंता शरद सोनवणे, भाऊसाहेब पालखेडे, भाऊसाहेब खांडबहाले, ढवळु फसाळे, दिपक वाघ, आदिवासी विकास सहकारी सोसायटी चेअरमन, सर्व कमिटी मेंबर्स, समस्त गांवकरी, वारकरी, पाहुणे मंडळी याच्या उपस्थित संपन्न झाला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रामपंचायत गणेशगांव, ग्रामस्थ प्रयन्त केले. ज्यांनी वाचनालयासाठी जागा दिली त्यांच्या मातोश्री सौ . अनुआई कोंडाजी कापसे भवन असे नाव देण्यात आले . हरीभाऊ व दसरथ कोंडाजी कापसे, कचरू दामु कापसे यांचा मान्यवरांच्या हस्ते आईसाहेबांचा पांडुरंगांची मूर्ती देऊन सन्मान करण्यात आला आमदार सरोजताई आहिरे, अशोक गाडेकर प्र . ग्रंथालय संचालक मुंबई . आणि सचिन जोपुळे याचे कडे वाचनालयांच्या आडचणी मांडल्या . नवीन मान्यता, दर्जा बदल, अनुदानात वाढ, या सर्व बाबी शासनाच्या विचाराधीन आहेत असे अशोक गाडेकर यांनी सांगीतले. मंत्री महोदय व आमदार महोदयांच्या सहकार्याने लवकरच आपण सर्वच प्रश्न मार्गी लावू असेही ते म्हणाले. या वेळी कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष हभप निवृत्ती महाराज कापसे, उपाध्यक्ष अनिता निवृत्ती कापसे, सरचिटणीस अनिल गोविंद पवार,सदस्य राजाराम केरु डहाळे,सदस्य विठोबा प्रभाकर कापसे,सदस्य शिवाजी निंबा कापसे,सदस्य बळवंत रुंजा कापसे , सर्व पदाधिकारी उपसतीत होते. वाचनालयाचे अध्यक्ष हभप निवृत्ती महाराज कापसे यांनी सर्वांचे आभार मानले

संदीप भानोसे यांना पुण्याच्या चाळिशीचा उंबरठा फाउंडेशनचा समाज रत्न पुरस्कार

नाशिक । प्रतिनिधी

गेले तीन दशके विविध सामाजिक उपक्रमातून डॉ. भानोसे यांनी आपला एक वेगळा ठसा उमटवलेला आहे. २५ मार्च २०१८ पासून सुरू झालेले वाहतूक सुरक्षा अभियान व पर्यावरण रक्षा अभियान याचे १४ जागतिक विक्रम झालेले आहेत. तर अडीचशेच्यावर गड किल्ल्यांवर साफसफाई व संवर्धन कार्य केले आहे. त्यांचे गोदा स्वच्छता व नंदिनी स्वच्छता अभियान सातत्याने सुरू असते. दिड हजार महाविद्यालय व ५०० शाळांमध्ये १५ लाख विद्यार्थ्यांना प्रबोधन करून जागृत करण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. या सर्व कार्याचा गौरव म्हणून त्याची दखल घेत गेल्या ४ फेब्रुवारी रोजी पुण्याच्या चाळिशीचा उंबरठा फाउंडेशनचा प्रतिष्ठेचा 'समाज रत्न' पुरस्कार यंदाच्या वर्षी डॉ. संदीप भानोसे यांना प्रदान करण्यात आला आहे.

सदर कार्यक्रम पिंपरी, एमआयडीसी मधील ऑटो क्लस्टर हॉल येथे ४ फेब्रुवारी रोजी रविवारी सकाळी ११ वाजता संपन्न झाला. मुख्य अतिथी म्हणून पुण्यातील आमदार अण्णासाहेब बनसोडे, सुनील शेळके, अश्विनी जगताप, नगरसेवक शितल काटे, विनया तापकीर व समाजसेवक डॉ. आम्रपाली उपस्थित होते. चाळीशीचा उंबरठा फाउंडेशन महाराष्ट्र राज्य प्रमुख पाहुणे माजी महापौर संजोग वाघेरे, फाउंडेशनचे अध्यक्ष देविदास साबळे, उपाध्यक्ष सचिन शिंदे पाटील यांच्यासह अन्य पदाधिकाऱ्यांच्या हस्ते समाज रत्न पुरस्कारने डॉ. संदीप भानोसे यांना सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी पिंपरी चिंचवड विभागातील गरजू ३५ महिलांना शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले. कार्यक्रम संपल्यानंतर सर्वांनी मिळून गरुड झेप प्रतिष्ठानच्या सोबत वाहतूक सुरक्षा व पर्यावरण रक्षा अभियान राबविले.

१० हजार वारकऱ्यांना केले अन्नदान

त्रिमूर्तीनगर, नळवाडपाडा मित्रमंडळाचा उपक्रम

नाशिक । प्रतिनिधी

पंचवटीतील नवीन आडगाव नाका परिसरातील त्रिमूर्तीनगर मित्र मंडळ आणि दिंडोरी येथील नळवाड पाडा मित्र मंडळाच्या संयुक्त विद्यमाने संतश्रेष्ठ निवृत्तिनाथ महाराज यात्रेच्या पूर्वसंध्येला १० हजार भाविकांना महाप्रसादाचे वाटप केले. दरवर्षी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

त्र्यंबकेश्वर येथे यात्रेनिमित्त दिंडीमधील लाखो वारकरी बांधव सहभागी झाले होते. त्यात संतश्रेष्ठ निवृत्तिनाथ महाराज यांची यात्रा मंगळवारी (दि.६) रोजी उत्साहात पार पडली. यात्रेची तयारी प्रशासन आणि संस्थानकडून जोरदार केल्यामुळे यात्रा यशस्वी झाली.

नाशिक शहर, त्र्यंबकेश्वर ५, ६ दिवसांपासून हरिनामाच्या निनादात रंगले होते. अनेक दिंड्यांचा परतीचा प्रवास देखील सुरू झाला आहे.

नवीन आडगाव नका येथील त्रिमूर्तीनगर येथे जिभाऊ (फौजी महाराज) सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली सदाशिव चौधरी, नयन सूर्यवंशी. जितेंद्र सूर्यवंशी, विजय वाबळे, रेखा सूर्यवंशी, पल्लवी सूर्यवंशी, मुक्ता वाबळे, बापू गुढे, पोपट कोकाटे, आचारी भांगरे, पेंढारकर यांच्यासह भाविक उपस्थित होते.

नि.६

जाहीर नोटीस

धुळे येथिल मा. दिवाणी न्यायाधिश सो. कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

कि. दि. अर्ज. क्र. १७५/२०२३

१) मुरलीधर पुंडलिक पाटील उ.वय.:-४२, वर्ष, कामधंदा-शेती
रा.कापडणे ता.जि.धुळे
२) अल्का आनदराव पाटील
उ.वय.:- ४९ वर्ष, कामधंदा-घरकाम रा. जिराई ता पारोळा जि जळगाव
३) शोभाबाई देवाजी पाटील उ.वय.:-३ वर्ष, कामधंदा-घरकाम
रा. भामपुर ता शिरपुर जि धुळे
४) कुसुमबाई, सुरेश पाटील उ.वय.:-३५ वर्ष, कामधंदा-घरकाम
रा.कापडणे ता.जि.धुळे ....अर्जदार

।। विरुध्द ।।

कै. वत्सलाबाई पुंडलिक पाटील (मयत)
मृत्यु दिनांक ३/१०/२०२३
मुत्यु ठिकाण-नगाव ता.जि.धुळे ....सामनेवाला

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट VIII १८२७ कलम २ व ७ अन्वये कायदेशीर वारस दाखला मिळणेसाठी अर्ज. ज्याअर्थी अर्जदार याने धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो क स्तर. यांचे न्यायालयात दि.२४/१/२०२४ रोजी दि. कि. अर्ज. नं.१७५/२०२४ दाखल केलेला आह कै. वत्सलाबाई पुंडलिक पाटील हे मयत झाल्यानंतर त्याचे वारस डिक्लेर घोषित होवुन मिळण्यासाठी अर्जदार यानी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे अर्जदार याना वारस दाखला हा शासकीय, निमशासकीय कामासाठी तसेच महसुल दप्तरी,नगर भुमापन कार्यालयात सदर वारस दाखला लागणार आहे अर्जदार क्र १ ते ४ हे मयताचे कायदेशीर वारस आहेत व त्याच्या नवाने वारस दाखला मिळावा म्हणुन अर्जदार यानी प्रस्तुतचा अर्ज मे. न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि. १२/०३/२०२४ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो क स्तर कोर्ट नं. ६, यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थि मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणा-या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- ५/२/२०२४ (शिक्का) आदेशावरुन

कामगिरी कारकुन — **अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व. स्तर धुळे — **दिवाणी न्यायालय व. स्तर धुळे**

ॲड. शैलेश मदनलाल पंसारीया, धुळे
नि.६

जाहीर नोटीस

धुळे येथील मे. ५ वे सह दिवाणी न्यायाधीश क स्तर सो. यांचे न्यायालयात

दिवाणी किरकोळ अर्ज नं. २०७/२०२४

कल्पनाबाई प्रकाश पाटील वै. ....अर्जदार

।। विरुध्द ।।

कै. प्रकाश महादु पाटील (मयत) ....मयत

ज्याअर्थी की, कै. प्रकाश महादु पाटील हे अर्जदार नं. १ कल्पनाबाई प्रकाश पाटील यांचे पती आहे तर अर्जदार नं. २ सत्यजित प्रकाश वाघ (पाटील), ३. चेतन प्रकाश वाघ (पाटील), ४. स्वाती गजेंद्र पाटील हयांचे पिता आहे. कै. प्रकाश महादु पाटील यांचे दि. २५/८/२०१० रोजी मौजे बाळापुर ता.जि. धुळे निधन झालेले आहे. अर्जदार यांना शासकिय कामांसाठी वारस दाखला मिळण्याकरीता अर्जदारने बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये हे अरशिप सर्टीफीकेट मिळण्याकरीता या मे. कोर्टात अर्ज केलेला आहे. आणि ज्याअर्थी की, सदर अर्जाचे कामकाज दि. १५/३/२४ रोजी मे. कोटीत चौकशी कामी नेमलेले आहे.

त्याअर्थी की, सदर अर्जास कोणाचीही काहीही हरकत असल्यास वा कोणत्याही प्रकारे विरोध असल्यास, त्यांनी स्वतः किंवा त्यांचे कायदेशीर प्रतिनीधी वा वकीलांमार्फत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांच्या आंत आपले म्हणणे सादर करावे, अन्यथा कोणाचे काहीही म्हणणे नाही, हरकत नाही असे समजून योग्य तो आदेश पारीत केला जाईल यांची नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

धुळे
दिनांक- ५ /०२/२०२४ (शिक्का) आदेशावरुन

व.लिपीक — **अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व. स्तर धुळे — **दिवाणी न्यायालय व. स्तर धुळे**

प्रोसेज जमा — ॲड. एम. सी. बेडसे.
नि.६

जाहीर नोटीस

साक्री येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर यांचे कोर्टात

दि.कि.अ.नं. ४७/२०२४

१) श्री. शिवाजी गंगाराम सोनवणे, वगैरे ६ ....अर्जदार

।। विरुध्द ।।

कोणीही नाही ... जाबदेणार

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टीफिकेट) मिळणेसाठी मे, दिवाणी न्यायालय क, स्तर साक्री येथे दि. १/२/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, अर्जदार नं. १ ते ६ यांचे वडिल नाम कै. गंगाधर ऊर्फ गंगाराम बळीराम सोनवणे यांचे दि. ११/१०/१९९३ रोजी मौजे धमणार ता. साक्री जि. धुळे येथे निधन झाले आहे.

मयत कै. गंगाधर ऊर्फ गंगाराम बळीराम सोनवणे यांची पत्नी व अर्जदार नं. १ ते ६ यांची आई नामे कै. गंगुबाई गंगाराम सोनवणे ह्यांचे देखील दि. २१/०७/२०१२ रोजी मौजे धमणार ता. साक्री जि. धुळे येथे निधन झाले आहे. तसेच मयताच्या मृत्युसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

वारसांची नावे	नाते / संबध
१) श्री. शिवाजी गंगाराम सोनवणे	-मुलगा
२) श्री. अरविंद गंगाराम सोनवणे	-मुलगा
३) श्री. प्रकाश गंगाराम सोनवणे	-मुलगा
४) श्री. किशोर गंगाराम सोनवणे	-मुलगा
५) श्री. प्रमोद गंगाराम सोनवणे	-मुलगा
६) श्री. शरद गंगाराम सोनवणे	-मुलगा

मयतास वरील प्रमाणे वारस असुन यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही. खात निहाय शासकीय मदत मिळणेसाठी वारस दाखल आवश्यक असल्याने वरील वारसा व्यतीरीक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतीरीक्त कोणाचा काहीही हक्क अधिकार असल्यास त्यांनी साक्री येथील मे. दिवाणी न्यायाधिश क. स्तर यांचे न्यायालयत दि. ११/३/२०२४ रोजी स्वतः अगर वकीलांमार्फत हजर रहावे वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्याकामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत नाही असे समजुन योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल.

सदर जाहिर नोटीस मे. न्यायालयाची सहि शिक्क्यांनिशी प्रसिध्दीस दिली असे.

(शिक्का)

कामगिरी कारकुन — **अधिक्षक**
दिवाणी न्यायालय साक्री — **दिवाणी न्यायालय साक्री**

अनिल के गवळी
नि.६

जाहीर नोटीस

धुळे येथील म. दिवाणी न्यायाधीश (क) स्तर सो धुळे यांचे कोर्टात.

दिवाणी किरकोळ अर्ज नं. १९६/२०२४

इंदुबाई माधवराव माळी ....अर्जदार

।। विरुध्द ।।

कोणीही नाही ... जाबदेणार
कै. माधवराव गोरख माळी ....मयत

ज्याअर्थी अर्जदार नं. १ ते ३ यांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कोर्ट नं. ३ धुळे यांचे कडे दि. ३०/०१/२०२४ रोजी कि.दि.अर्ज नं. १९६/२०२४ चा अर्ज कै. माधवराव गोरख माळी रा. माळीवाडा, मु.पो कापडणे ता.जि. धुळे यांचे कायदेशीर वारस आहेत असे ठरवून मिळणेसाठी व ते कै. माधवराव गोरख माळी यांचे कायदेशीर वारस आहेत असा वारस दाखला (Legal Heirship Certificate) मिळणेकामी सदरचा अर्ज मे. न्यायालयात दाखल केलेला आहे.

मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौकशी दि. ११/०३/२०२४ ही निश्चीत केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस वैगेरे संबंधीताना कळविण्यात येते की, सदर अर्जासंबंधी कुणास काहीही हरकत असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कोर्ट नं. ३ धुळे यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस व तत्पूर्वी उपस्थित राहून हरकत नोंदवावी. त्याअर्थी मे कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाची काहीही हरकत आली नाही, तर सदर अर्जास कोणाची काहीही एक हरकत नाही असे समजून सदर अर्जाचे कामकाज पूर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची/ हरकतीची कोणतीही दाखल घेतली जाणार नाही.

सदरची जाहीर नोटीस मे. न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी प्रसिद्ध केली असे.

धुळे
दि. ३ /०२/२०२४ (शिक्का) आदेशावरुन

कामगिरी कारकुन — **सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायाधीश क. स्तर धुळे — **दिवाणी न्यायाधीश क. स्तर धुळे**

ॲड. कमलेश झेड. मुथा
नि.६

जाहीर नोटीस

धुळे येथील मा. दिवाणी न्यायाधिश सो. क.स्तर यांचे न्यायालयात

दि. कि. अर्ज.कं. १८४/२०२४

१) श्री. शांतीलाल तुकाराम पाटील
उ.व.-७६ वर्ष, धंदा-शेती रा. नंदाणे, ता.जि.धुळे
२) श्री. कांतीलाल तुकाराम पाटील
उ. व. ६८ वर्ष, धंदा -शेती रा. कुंडाणे, ता.जि. धुळे
३) बाबुलाल तुकाराम पाटील
उ.व.-५९ वर्ष, धंदा -शेती व शिपाई रा. नंदाणे, ता.जि.धुळे
४) श्रीमती चंद्रभागाबाई भ्र जयराम पाटील
उ.व.-वर्ष, धंदा -शेती रा. वधाने, ता. साक्री जि. धुळे
५) श्रीमती इंदुबाई भ्र. अशोक पाटील
उ.व.- वर्ष, धंदा - शेती रा. शिरधाणे प्र.नेर, ता. जि. धुळे ....अर्जदार

।। विरुध्द ।।

कोणीही नाही ...जाबदेणार

आणि

कै. लटकणबाई तुकाराम पाटील मृत्यु दि.०२/०३/२०२३
मृत्यु ठिकाण - नंदाणे, ता.जि. धुळे. ....मयत

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत कै. लटकणबाई तुकाराम पाटील यांचे कायदेशीर वारस आहे. असा वारस दाखला मिळणेसाठी मा.दिवाणी न्यायाधिश सो. वरीष्ठ स्तर धुळे येथे दि.कि. अर्ज क्र. १८४/२०२४ दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास ज्या कोणाची कोणत्याही स्वरूपाची हरकत असेल त्यांनी आपली लेखी हरकत धुळे येथील मे. ७ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात दि.१२/०३/२०२४ रोजी सकाळी १०:३० वाजता मे. कोर्टात स्वतः किंवा वकिलामार्फत /प्रतिनिधीमार्फत हजर राहून सदरकामी आपले म्हणणे, तक्रारी व लेखी स्वरूपात हरकत सादर करावी. वरील तारखेस कोणाचीही लेखी स्वरूपात हरकत मे. न्यायालयात न आल्यास सदर कामी योग्य ती चौकशी होवून पुढील सुनावणी करण्यात येईल. त्यानंतर कुणाचीही काहीही हरकत ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सदरची जाहिर नोटीस कोर्टाच्या सही/ शिक्यानिशी आज दि. ५/२/२०२४ रोजी प्रसिध्दीस दिली असे.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- ५/२/२०२४ आदेशावरुन

(शिक्का)

कामगिरी कारकुन — **अधिक्षक**
दिवाणी न्यायाधिश क. स्तर, धुळे — **दिवाणी न्यायाधिश क. स्तर, धुळे**

ॲड. संदीप अर्जुन गर्दे
नि.६

जाहीर नोटीस

धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश क स्तर सो. यांचे न्यायालयात

दि.कि. अर्जक्र. २००/२०२४

१. आबा भिका गवळी, वगैरे ....अर्जदार

।। विरुध्द ।।

निरंक ... जाबदेणार

कै.सखुबाई भिका गवळी,
रा. मु.आमदड पो. काळखेडे, ता. जि. धुळे ....मयत

ज्या अर्थी अर्जदारांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर कोर्ट क्र. सो. यांचेकडे दि.३०/१/२०२४ रोजी अर्जदार यांनी कि.दि.अर्ज क्र.२००/२०२४ चा अर्ज कै.सखुबाई भिका गवळी यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार यांना मयतांचे शासकीय व निमशासकीय कामासाठी मे. न्यायालयातून अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस दाखला मिळणेकामी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौ. दि. १४/०३/२०२४ हि निश्चित केली आहे त्या अर्थी तमामजनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधिताना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कोर्ट नं. ७ सो, धुळे यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारीखेस वा तत्पूर्वी उपस्थित राहून हरकत नोंदववी, त्याअर्थी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित तारखेपर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पूर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारींची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण : धुळे
दि. ५/२/२०२४ आदेशावरुन

(शिक्का)

कामगिरी कारकुन — **अधिक्षक**
दिवाणी न्यायाधीश क. स्तर धुळे — **दिवाणी न्यायाधीश क. स्तर धुळे**

न्यूज कॉलम

टॉवर ऑईलचोरी; तिघांविरूद्ध गुन्हा

साक्री । तालुक्यातील शिवाजीनगर शिवारातील साक्री ते नंदुरबार रस्त्यावरील सुजलॉन कंपनीच्या टॉवरमधील ऑईलचोरीप्रकरणी तीन संयशितांवर गुन्हा दाखल झाला. सुरक्षा रक्षक लहू आसाराम बोरसे यांच्या फिर्यादीनुसार संशयित ज्ञानेश्वर जागू माळी, किशोर सदाशिव माळी व ज्ञानेश्वर विठ्ठल माळी यांनी ट्रान्सफार्मरमधून १६ हजारांचे सुमारे २०० लीटर ऑईल चोरून बोलरो (एमएच ४६, बीएफ ७०६७) वाहनाद्वारे लांबविले.

वकील दांपत्य खुनाचा वंचित आघाडीतर्फे निषेध

नाशिक । अहमदनगर जिल्ह्यातील वकील दांपत्याचे अपहरण करून निर्घृणपणे खुनाचा प्रकार घडला. या घटनेचा वंचित बहुजन आघाडीतर्फे तीव्र निषेध नोंदवण्यात आला आहे. ही घटना समाज मनावर सुन्न करणारी आहे. यामुळे राज्यभरातील वकिलांमध्ये संतापाची लाट निर्माण झालेली आहे. या घटनेतील आरोपींना मोका अंतर्गत कठोर कारवाई शासनाने करावी, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीतर्फे करण्यात आल्याची माहिती ईश्वर राजपूत यांनी पत्रकाद्वारे दिली आहे.

'स्वयंसहायता बचत गटांनी अर्ज करावे!

धुळे । सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या स्वयंसहायता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने पुरवठा योजनेचा लाभ घेण्यासाठी स्वयंसहायता बचत गटांनी १५ फेब्रुवारीपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन समाज कल्याणचे सहायक आयुक्त सुंदरसिंग वसावे यांनी केले आहे. शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी ही योजना आहे.

रतनपुरा जि.प गटातील रस्त्यांच्या कामाचे खा. डॉ.भामरेंच्या हस्ते भुमीपुजन

बाळासाहेब भदाणेंकडून विकासाला गती

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

धुळे तालुक्याच्या विकासासाठी बाळासाहेब भदाणे यांनी झोकून दिले आहे. त्यांच्या विशेष प्रयत्नातून मंजुर झालेल्या धुळे तालुक्यातील बोरकुंड, रतनपुरा जि.प गटातील प्रमुख पाच रस्त्यांच्या मजबुतीकरण व डांबरीकरण कामाचे भुमीपूजन नुकतेच खा.डॉ. सुभाष भामरे यांच्या हस्ते करण्यात आले. या साडेपाच कोटींच्या रस्त्याच्या कामांमुळे ग्रामस्थांच्या दळवळाची मोठी सोय होणार असून ग्रामस्थांनी बाळासाहेब भदाणे यांचे विशेष आभार मानले आहेत.

धुळे तालुक्यातील बोरकुंड, रतनपुरा मतदार संघासह संपुर्ण तालुक्याच्या विकासासाठी इंदुबाई भदाणे प्रतिष्ठाणचे अध्यक्ष व भाजपा नेते बाळासाहेब भदाणे यांनी जोरदार प्रयत्न सुरू आहेत. आतापर्यंत त्यांच्या प्रयत्नाने तालुक्यात अनेक विकास कामे झाली आहे. तालुक्यातील अनेक रस्त्याचीही वाताहत झालेली होती. ही बाब लक्षात घेवून व ग्रामस्थांच्या आग्रही मागणीनुसार बाळासाहेब भदाणे यांनी सतत पाठपुरावा करून जुनवणे ते हेंद्रूण, होरपाडा ते मांडळ, कुळथे ते नंदाळे बु, बोरकुंड ते तरवाडे व तरवाडे ते लोंढरे या रस्त्यांच्या मजबुतीकरण व डांबरीकरणासाठी तब्बल साडेपाच कोटीचा निधी खेचून आणला. या रस्ता कामाचे भूमिपूजन नुकतेच खा.डॉ.सुभाष भामरे यांच्या हस्ते झाले.

याप्रसंगी भाजप धुळे ग्रामीण जिल्हाध्यक्ष बबन चौधरी, इंदुबाई भदाणे प्रतिष्ठानचे अध्यक्ष व भाजपा नेते बाळासाहेब भदाणे, जि.प.चे माजी सदस्य प्रभाकर पाटील, जि.प. सदस्य संग्राम पाटील, आशुतोष पाटील, भाजप जिल्हा उपाध्यक्ष भाऊसाहेब देसले, भाजप उद्योग आघाडी प्रदेश उपाध्यक्ष उत्कर्ष पाटील, तालुकाध्यक्ष देवेंद्र पाटील, रितेश परदेशी, पं.स.चे उपसभापती देवेंद्र माळी, माजी उपसभापती भैय्यासाहेब पाटील, पं.स.सदस्य रंगुताई ठाकरे, बाबाजी देसले, तालुका सरचिटणीस श्याम बडगुजर, माजी सदस्य मुन्ना पवार, डॉ. राजेंद्र पाटील, बोरकुंड सरपंच हेमंत भदाने, राजेंद्र मराठे, संजय माळी, संजू भाऊसाहेब, जुनवणे सरपंच योगेश पाटील, धाडरे संरपंच राहुल पाटील, हेंद्रूण सरपंच गोरख राजपूत, उपसरपंच दीपक कोळी, संजय राजपूत, मोघण उपसरपंच विलास पाटील, सुशील गवळी, जिभो पाखले, विलास पाटील, किशोर पाटील, कैलास पाटील, गोरख माळी, मोरदड सरपंच गोविंदा पाटील, माजी सो.चेअरमन गुणवंत पाटील, हरिदास खैरनार, संजय पाटील, भटा आबा, नाना पाटील, ज्ञानेश्वर पाटील, भिरडाई संरपंच राजेश पाटील, चांदे उपसरपंच रावसाहेब पाटील, नंदाळे सरपंच योगेश पाटील, नाणे सरपंच अजय राजपूत, विसरणे सरपंच रवी पाटील, दोदवाड ग्रा.पं.सदस्य रवींद्र बिर्हाडे, भानुदास पाटील, भाजप जिल्हा प्रसिद्धीप्रमुख जितू जैन, गणेश पाटील, समाधान पाटील, आशिष भदाणे, निलेश पाटील, खुशाल माळी, राजेंद्र पाटील, होरपाडा सरपंच बुधा खुरणे, रवींद्र कठाळे, रामचंद्र खैरनार, शामराव वाघ, भीमराव कठाळे, निलेश कठाळे, कौतिक वाघमोडे, विठोबा कठाळे, अतुल कठाळे, दगडू अहिरे, जिभाऊ दळवी, मोरदड तांडा सरपंच देविदास चव्हाण, उपसरपंच नवल पवार, कुळथे संरपंच गंगुबाई सोनवणे, उपसरपंच दिनेश रोज, ग्रा.पं. सदस्य बापू रतन नवघरे, वर्धमान जाट, रमेश मराठे, योगेश राठोड, अरुण कव्हाड आदीं ग्रामस्थ व बाळासाहेब भदाणे मित्रपरिवार व भाजपा पदाधिकारी उपस्थित होते.

पळासनेरला ३ कोटींच्या निधीतून जलकुंभ, पाइपलाइन कामाचे भूमिपूजन

शिरपूर । लक्ष महाराष्ट्र वृत्त

पाणीटंचाईची समस्या लक्षात घेता सध्या येणाऱ्या काळात पाणी जपून वापरावे, पाणी कितीही असले तरीसुद्धा पाण्याची समस्या अत्यावशक समस्यांमध्ये येते. शिरपूर तालुक्यासह पळासनेरवासीयांच्या मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी धुळे-नंदुरबार विधान परिषदचे आमदार अमरिशभाई पटेल. माजी शिरपूर नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल, भारतीय जनता पक्षातील पदाधिकारी प्रयत्नशील असल्याचे आमदार काशीराम पावरा यांनी सांगितले.

पळासनेर (ता. शिरपूर) येथील जलजीवन मिशनअंतर्गत नवीन जलकुंभ उभारणे व पाइपलाइन करण्यासाठी एक कोटी ७२ लाख रुपये व मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत एक कोटी २० लाख रुपये महामार्ग एनएच३ पासून ते चत्तरसिंगपाडा रस्ता सुधारणा डांबरीकरणकामाचे भूमिपूजन आमदार काशीराम पावरा यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमात उपस्थित मान्यवर धुळे जिल्हा परिषद उपाध्यक्ष देवेंद्र पाटील, जिल्हा परिषद सदस्य जयवंत पाडवी, पंचायत समिती सदस्य मानसिंग पावरा, लोकनियुक्त सरपंच शीतल छोटू कोळी, उपसरपंच राजू भिल, ग्रामपंचायत सदस्य छोटू कोळी यांची उपस्थिती होती. गावात पाण्याची थोडीफार बऱ्याच वर्षांपासून पाण्याची टंचाई होती. त्यासाठी ग्रामस्थांची अनेक दिवसांपासून अजून एक पाण्याची टाकी असावी, अशी मागणी होती. हे लक्षात घेऊन सरपंच शीतल कोळी व ग्रामपंचायत प्रभारी छोटू कोळी यांनी दखल घेऊन धुळे-नंदुरबार विधान परिषदचे अमरिशभाई पटेल, माजी शिरपूर नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल, आमदार काशीराम पावरा यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केला होता. माजी शिरपूर नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल, आमदार काशीराम पावरा यांच्या प्रयत्नाने मंजूर झाल्याने ग्रामस्थांनी आभार मानले. या वेळी सुरत भिल, कैलास पावरा, धर्मेंद्र गिरासे, शिवाजी चारण, किशोर चित्ते, ग्रामविस्तार अधिकारी प्रकाश बोरसे, सुनील पावरा, सुभाष शिंदे, संजय सिंग गिरासे. गुलाबराव पाटील, मनीष गिरासे, भीमसिंग राजपूत, योगेश माळी, सुदाम भिल, गणपत जाट, रामकिशोर यादव, अशोक महाले, दीपक कोठावदे, सतीश सोनवणे, रहीम पिंजारी, महेंद्र कोळी, मिलिंद सोनकांबळे, प्रभू चारण आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

वेहेरगाव येथे पेव्हर ब्लॉक कामाचे भूमिपूजन

जैताणे ।लक्ष महाराष्ट्र वृत्त

मौजे वेहेरगाव (वाघापूर) येथे दलीत वस्तीमध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे साठी गावातील सामाजिक कार्यकर्ते सोनु बोरकर व रमेश वाघमोडे यांच्या प्रयत्नानेसाक्री तालुक्यातील आमदारमंजुळ तुळशीराम गावित यांच्या कडून दलीत वस्तीमध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे या कामासाठी तब्बल १५ लाख रुपये निधी उपलब्ध करून दिला आहे. सदर कामाचे भूमिपूजन गावातील ग्रा. पं. सरपंच, सदस्य, ग्रा. पं. कर्मचारी गावातील ग्रामस्थ यांच्या उपस्थतीमध्ये करण्यात आले.

देवरे अभियांत्रिकीच्या गुंजन पाटीलला ज्युडोमध्ये रौप्य पदक

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेच्या बापूसाहेब शिवाजी राव देवरे अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थीनी गुंजन रविंद्र पाटील ने नागपूर येथे नुकत्याच झालेल्या सुवर्ण महोत्सवी राज्य स्तरावरील क्रिडा स्पर्धेत बावन्न किलो वजनी गटातून ज्युडो स्पर्धेत रौप्यपदक मिळवून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला . तिच्या या उल्लेखनीय कामगिरी बद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा डॉ हितेंद्र पाटील, विभाग प्रमुख प्रा डॉ एस डी सूर्यवंशी, प्रा डॉ पी एस पाटील, प्रा विनोद शिंदे क्रिडा संचालक प्रा प्रशांत वाणी यांच्या प्रमुख उपस्थितीत सत्कार करण्यात आला व स्पर्धेतील यशाबद्दल तिचे अभिनंदन करण्यात आले. श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे अध्यक्ष मा आ बाबा साहेब कुणाल पाटील व महाविद्यालयाचे अध्यक्ष मा दादासाहेब सुभाष देवरे यांनी कु गुंजन पाटील चे रौप्यपदक मिळविल्या बद्दल हार्दिक अभिनंदन केले आहे.

विसपूते माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात ताणतणाव मुक्त परीक्षेवर मार्गदर्शन

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ, धुळे संचलित बापूसाहेब डी. डी. विसपूते माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात इ. १० वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी आज ताणतणाव मुक्त परीक्षा या विषयावर मार्गदर्शन ठेवण्यात आले होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष मा. नानासाहेब महेंद्रजी विसपूते, सचिव मा. स्मिताताई विसपूते, मार्गदर्शक मा. श्री भगवंत चव्हाण, प्राचार्य मा. श्री पी. बी. पाटील, सर्व स्टाप व विद्यार्थी उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष मा. नानासाहेब महेंद्रजी विसपूते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. सुरूवातीला मान्यवरांच्या शुभहस्ते प्रतिमापूजन करून माल्यार्पण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा. श्री नानासाहेब यांनी केले. प्रास्ताविकात नानासाहेबांनी विद्यार्थ्यांना प्रामाणिक पणे अभ्यास करून परीक्षेला सामोरे जावे तसेच आईवडील व गुरूजींच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील रहावे असे सांगीतले.

मार्गदर्शन करतांना श्री भगवंत चव्हाण सर यांनी, ठरविलेले ध्येय गाठण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे सांगीतले. तसेच यशस्वी जीवनासाठी आधी तावूनसुलाखून निघावे लागेल तर उज्वल भविष्य घडेल त्यासाठी अभ्यास, चांगली संगत व शिक्षक आणि आईवडील यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरेल. परीक्षेचा तणाव न बाळगता मुक्त वातावरणात परीक्षा दिली पाहीजे हे ही सांगीतले. नियमीत अभ्यास करून, आईवडीलांसह गुरुजनांचे संस्कार जपून, त्यांनी दाखवलेल्या मार्गावर मार्गक्रमण करून यश मिळवता येईल. आईवडीलांचे स्वप्न पुर्ण करण्यासाठी प्रयत्नशील रहावे. असे ही नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. श्री जयेश गाळणकर यांनी तर आभार प्रदर्शन संस्थेच्या सचिव स्मिताताई विसपूते यांनी केले. कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी एस. आर. पाटील, योगेंद्र पाटील, महेश पाटील, राजश्री मासूळे, कुणाल साळूंके, अभिज्ञ पवार, महेश पवार व विलास भामरे यांनी मेहनत घेतली.

आग पिडीत कुटूंबाच्या चेहऱ्यावर डॉ. बच्छाव यांनी फुलविले हास्य

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

शहरातील मोगलाई भागातील आग पिडीत ढोले कुटूंबाच्या चेहेर्यावर आरोग्यदुत डॉ.विलास बच्छाव यांनी हास्य फुलविले. या कुटूंबाला महिनाभराचा किराणा, संसारोपयोगी साहित्यासह आर्थिक मदतदेत आपली सामाजिक बांधिलक जपली. याबद्दल ढोले कुटूंबासह परिसरातील नागरिकांनी देखील डॉ.बच्छाव यांचे विशेष आभार मानले.

पांझरा नदी किनारी असलेल्या मोगलाई भागात मधुकर ढोले हे राहतात. त्यांच्या दि.२ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास शॉर्ट सर्किटमुळे अचानक आग लागली. काही क्षणातच आगीने रौद्र रूप धारक केले. त्यात कपडे, संसारोपयोगी साहित्यासह दैनदिन वापरातील वस्तुही जळल्याने तासाभरात ढोले यांच्या संसाराची राख झाली. त्यामुळे ढोल कुटूंबाचा संस्कार उघड्यावर आला. या कुटूंबाला मदतीची नितांत गरज होती. प्रसारमाध्यमातून हे वृत्त सटाणा येथील महाराष्ट्र प्रदेश भाजपाचे प्रांतिक सदस्य तथा माजी उपसभापती डॉ. विलास बच्छाव यांना कळाले. त्यांनी तत्काळ धुळ्यातील आपल्या टिमला ढोले कुटुंबाला धिर देण्यास पाठविले. याबरोबच महिनाभराचा किराणा (५ किलो तेल, साखर, शेंगदाणे, गव्हाचे पिठ, दाळी) यासह संसारोपयोगी साहित्य आणि आर्थिक मदत दिली.

डॉ.शेखर-पाटील यांच्या याचिकेवर सोमवारी सुनावणी

नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सध्या राज्यात वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यापासून ते उपनिरीक्षकांपर्यंतच्या बदल्यांचे सत्र सुरू आहे.

यामध्ये डॉ. बी.जी. शेखर-पाटील यांची पुणे मोटार वाहन विभागाच्या विशेष पोलीस महानिरीक्षक पदी बदली करण्यात आली. डॉ. शेखर-पाटील यांची येत्या मे महिन्यात सेवानिवृत्ती असल्याने त्यांनी या बदलीविरोधात मॅटमध्ये याचिका दाखल केली आहे. त्यावर येत्या सोमवारी (ता.१२) सुनावणी होणार आहे. बदलीला स्थगिती मिळते का, याकडे आता लक्ष आहे. एप्रिल २०२२ मध्ये त्यांनी नाशिकच्या विशेष पोलिस महानिरीक्षक पदाची जबाबदारी घेतली होती. या दरम्यान त्यांनी अंमलीपदार्थविरोधात दमदार काम केले.

दीक्षांत संचलन सोहळ्याचे आयोजन

धुळे । पोलिस प्रशिक्षण केंद्रातील सत्र क्रमांक दहावा नवप्रविष्ठ पोलिस प्रशिक्षणार्थींचा दीक्षांत समारंभ बुधवार, दि. ७ फेब्रुवारी रोजी सकाळी ७:३० वाजता पोलिस प्रशिक्षण केंद्राच्या कवायत मैदानावर जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार आहे. अशी माहिती धुळे पोलिस प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य विजय पवार यांनी दिली.

लोकसभेवेळी विधानसभेचे जागा वाटप झाले तरच भाजपला मदत

बच्चू कडू यांचा इशारा

नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त

भाजपला लोकसभा जितकी महत्वाची आहे, तितकीच आम्हाला विधानसभा निवडणूक महत्वाची आहे. परंतु, लोकसभा निवडणुकीवेळी विधानसभेची जागा निश्चिचती झाली तरच, भाजपला मदत करता येईल, असा सूचक इशारा प्रहार संघटनेचे प्रमुख आमदार बच्चू कडू यांनी येथे दिला.

भाजपने लोकसभेपूर्वी विधानसभेच्या जागा वाटपाचा प्रश्न सोडवायला हवा. आम्हाला दुसऱ्या कुणाच्या कोट्यात जाण्याची गरज नाही. प्रहार हाच आमचा कोटा आहे. जागा वाटपाचा प्रश्न सुटला नाही तर आम्ही जळगाव, अमरावती या ठिकाणी निवडणुका लढू, असे त्यांनी सूचित केले. राजकीय नेत्यांमुळे समाजात दुही निर्माण होत असल्याच्या प्रश्नावर त्यांनी नागरिकांनी आपल्यासह कुठल्याही राजकीय नेत्यांच्या विधानांना फारसे गांभिर्याने घेऊ नये, असा सल्ला दिला. प्रत्यक्षात काय घडते, आपण एकोप्याने किती चांगले राहू शकतो याकडे लक्ष द्यावे, असे आवाहन केले.

टेकवाडे प्राथमिक शाळेत सांस्कृतिक सोहळा संपन्न

वरुळ । लक्ष महाराष्ट्र वृत्त

शिरपूर तालुक्यातील आरसी पटेल मराठी प्राथमिक शाळा टेकवाडे येथे इयत्ता बालवाडी ते चौथी या वर्गातील विद्यार्थ्यांचा स्नेहसंमेलन सोहळा आयोजित करण्यात आला होता.

या सांस्कृतिक सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी शिरपूर सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन दिलीपभाई पटेल उपस्थित होते. तसेच प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे सीईओ डॉ. उमेश शर्मा, पंचायत समिती सदस्य प्रतिनिधी लखन चौधरी, माजी पंचायत समिती सदस्य बापू पारधी,ग्रामपंचायत खामखेडा सरपंच बारकू धनगर, माजी सरपंच टेकवाडे संजय धनगर, माजी उपसरपंच सदाशिव वाडीले वि.का.सोसायटी टेकवाडे चेअरमन दिलीप धनगर व्हॉइस चेअरमन किशोर कोळी माजी चेअरमन विजय चौधरी, माजी सरपंच प्रतिनिधी खामखेडा रमेश शिरसाठ शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष मोतीलाल पटेल उपाध्यक्ष श्रीकृष्ण वाडीले, पोलीस पाटील भरवाडे संजय पटेल पोलीस पाटील खामखेडा सागर धनगर शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष युवराज धनगर, ग्रामपंचायत सदस्य दुर्गेशभाई पटेल, भरत पाटील,सामाजिक कार्यकर्ते भरतभाऊ राजपूत, दाजभाऊ राजपूत,चतुर कोळी, दिलीप वानखेडे, पालक प्रतिनिधी अमोल धनगर, महेंद्र राजपूत, भैय्या धनगर, प्राचार्य एन सी पवार, पर्यवेक्षक के बी चौधरी,प्रा. एस एम पाटील,मुख्याध्यापक सी.डी. पाटील, बी आर महाजन, ईश्वर पाटील, गणेश साळुंखे, गोपाल पाटील उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते माता सरस्वती व नटरंग यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

शाळेचे मुख्याध्यापक आर बी खोंडे यांनी प्रास्ताविकातून सांस्कृतिक कार्यक्रमाचा उद्देश व थीम याबाबत मनोगत व्यक्त केले समाज प्रबोधन ही आज काळाची गरज आहे आणि म्हणून आमचे विद्यार्थी समाजातील विविध विकृतींवर एक चांगला मेसेज या कार्यक्रमाच्या निमित्ताने देतील म्हणून पूर्णवेळ कार्यक्रम पाहण्याचे आवाहन मुख्याध्यापकांनी केले शाळेतील २०८ विद्यार्थ्यांपैकी १८० विद्यार्थी या कार्यक्रमात सहभागी होते स्त्री भ्रूण, पर्यावरणाचा असमतोल, मोबाईलचा अतिरेक, अंधश्रद्धा अशा अनेक विषयांवर विद्यार्थ्यांनी छोट्या छोट्या नाटक व नकलाच्या माध्यमातून समाज प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला त्यासोबत नृत्य व गायन या कलाही सादर केल्या यासाठी परिसरातील पदाधिकारी व मान्यवरांनी विद्यार्थ्यांना भरभरून प्रतिसाद दिला व कार्यक्रमाच्या नियोजनाचे कौतुक केले.

सांस्कृतिक सोहळा सूत्रसंचालन उपशिक्षिका जयश्री पाटील इंग्रजी शिक्षक अनिल माळी यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी उपशिक्षक संजय पटेल उपशिक्षिका बबीता काठोळे बालवाडी शिक्षिका सुनंदा सोनार शिक्षकेतर कर्मचारी भाईदास पावरा ज्ञानेश्वर वारुळे, ममराज जाधव, किशोर जोशी, आशा भील यांनी परिश्रम घेतले.

सांस्कृतिक कार्यक्रमात चिमुकल्यांनी सादर केले स्त्री च्या आयुष्यातील विविध टप्पे

शिरपूर । लक्ष महाराष्ट्र वृत्त

शहरातील क्रांतीनगर येथे आर.सी.पटेल मराठी प्राथमिक शाळेत सांस्कृतिक कार्यक्रमात चिमुकल्यांनी स्त्री च्या आयुष्यातील विविध टप्पे सादर केले.

या वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रमात बाईपण भारी देवा या थीमवर आधारित नृत्य, नाट्य अशा विविध कार्यक्रमातून स्त्री च्या आयुष्यातील विविध टप्पे सादर करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष सीईओ डॉ.उमेश शर्मा होते. प्रमुख अतिथी पंचायत समिती सदस्य चंद्रकांत पाटील, माजी सरपंच शिरीष पाटील शिंगावे, चंद्रकांत लोटन पाटील (माजी उपसरपंच शिंगावे), श्याम पाटील, मनोहर पाटील, संस्थेतील विविध शाळांचे मुख्याध्यापक व अनेक मान्यवर उपस्थित होते. सर्व प्रमुख अतिथी यांच्या हस्ते माता सरस्वती व नटराजाचे पूजन, दीप प्रज्वलन करून सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. मान्यवरांचा सत्कार मुख्याध्यापक पी.एस.गहिवरे यांनी केला.मुख्याध्यापक पी.एस.गहिवरे यांनी प्रास्ताविकात वर्षभरातील शाळेत राबवल्या जाणाऱ्या विविध स्पर्धा, उपक्रम, विद्यार्थी व शिक्षकांच्या प्रगतीचा आढावा सादर केला.

दैनिक
लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक

त्र्यंबकेश्वरमध्ये संत निवृत्तीनाथ महाराजांच्या यात्रेला उत्साहात सुरुवात

टाळ मृदुंगाचा गजर, हरिनामाच्या जयघोषाने दुमदुमले त्र्यंबकेश्वर

नाशिक । जिल्ह्याचे पालकमंत्री दादा भुसे यांच्या हस्ते संत निवृत्तीनाथ महाराज समाधीची महापुजा करण्यात आली. यात्रेत वारकऱ्यांमध्ये प्रचंड उत्साह पाहायला मिळत आहे. निवृत्तीनाथ मंदिर परिसरात दर्शनासाठी जवळपास दोन किमीपर्यंतच्या रांगा लागल्या होत्या. संत निवृत्तीनाथ संजीवन समाधी मंदिरात आलेल्या दिंडीला मुख दर्शनासाठी सोडण्यात येत आहे. यात्रेनिमित्त त्र्यंबकमध्ये रहाट पाळणे देखील सज्ज झाले आहेत. सायंकाळी रहाट पाळण्यांची मजा लुटण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी होते. यावर्षी बाहेरच्या राज्यातील दिंड्यांची संख्या लक्षणीय आहे. लोकनेते शंकरराव बाळाजी वाजे पतसंस्थेच्या फिरत्या दवाखान्याद्वारे संत निवृत्तीनाथ यात्रेसाठी जाणाऱ्या दिंड्यांतील वारकऱ्यांवर मोफत उपचार सुरू आहेत. १० हजार वारकऱ्यांवर मोफत औषधोपचार करण्यात आले. त्र्यंबकमध्ये यंदाच्या यात्रेसाठी होणाऱ्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनाकडून चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. शहरातील विविध ठिकाणी ४० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे चोरट्यांवर पोलिसांची करडी नजर आहे.

दैनिक
लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक

स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी शालेय जीवनापासूनच प्रयत्नशील रहावे : मित्तल

नाशिक जिल्हा परिषद अध्यक्ष चषक जिल्हास्तरीय स्पर्धांचे उद्घाटन

नाशिक। स्पर्धेच्या युगात प्रत्येक क्षेत्रात टिकून राहण्यासाठी विद्यार्थ्यांनी शालेय जीवनापासुनच प्रयत्नशील रहावे. आपली कला, संस्कृती व गुणवत्ता सिद्ध करून भविष्यात आपले करीअर घडवावे तसेच प्रत्येक क्षेत्रात मिळणाऱ्या संधीचे सोने करावे, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी केले. नाशिक येथील स्व.मीनाताई ठाकरे विभागीय क्रीडा संकुलाच्या मैदानावर जिल्हा परिषद अध्यक्ष चषक स्पर्धा अतंर्गत जिल्हा स्तरीय कला, क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धाच्या उदघाटनाप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी नाशिक जिल्हयातील पंधरा तालुक्यातील सुमारे १ हजार ४०० पेक्षा अधिक खेळाडू व प्रशिक्षक, संघ व्यवस्थापक, शिक्षक व पालकांनी उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदवला. जिल्हा परिषद अध्यक्ष चषक स्पर्धेच्या उदघाटनप्रसंगी सहभागी स्पर्धकांनी शानदार संचलन करुन प्रमुख पाहुण्यांना मानवंदना दिली. यावेळी जेम्स इंग्लिश मेडियम स्कुलच्या बँड पथकांनी तालबध्द साथ दिली. संचलनाव्दारे ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेतील खेळाडूंची शिस्तबध्दता व मुलांचा उत्साह दिसून आला. सहभागी खेळाडूंना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या सर्व प्रकारच्या सोयी सुविधांची मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रत्यक्ष पाहणी करुन समाधान व्यक्त केले. प्रत्यक्ष मैदानावर जावून खेळाडूंशी संवाद साधला. तसेच नाणेफेक करुन प्रत्यक्ष स्पर्धाना प्रारंभ केला. याप्रसंगी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) रविंद्र परदेशी, प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी डॉ.नितीन बच्छाव, उपशिक्षणाधिकारी भास्कर कनोज, अधिक्षक श्रीधर देवरे, धनंजय कोळी, निलेश पाटोळे, संतोष झोले, प्रशासन अधिकारी रविंद्र आंधळे, अनिल दराडे सर्व गटशिक्षणाधिकारी व सर्धा प्रमुख उपस्थित होते.